...क

...णूस

३ डिसेंबर ८३ / दोन रुपये

मानवाच्या
विकासासाठी
व
जागतिक
शांततेसाठी
'राष्ट्रकुल'

Other Woman
उंबरठा
एक बार फिर
'अर्थ'



मुक्ततेकडील वाटचाल

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : सत्ताविसावा

३ डिसेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सजय पवार

# राणी, आम्हाला क्षमा कर !

लहानपणी शाळेत शिकत असताना ख्यात-नाम साहित्यिक कै. ग. दि. माडगूळकर यांचा 'औंधाचा राजा' हा लेख वाचला होता. आपल्या गावामध्ये राजा येणार, म्हटल्यावर नागरिकांची उडालेली धांदल-गडबड, राजाबद्दल त्यांना वाटणारी आपुलकी, राजाचं आगमन, स्वागत-सोहळा इत्यादींच वर्णन माडगूळकरांनी फार आकर्षक पद्धतीने त्या लेखामध्ये केलं आहे. गेल्या आठवड्यात इंग्लंडची राणी एलिझाबेथ भारतात आली आणि इथल्या वृत्तपत्रांनी तिचं केलेलं उन्मुक्त स्वागत पाहून माडगूळकरांच्या त्या लेखाची आठवण झाली; पण या दोन गोष्टींमध्ये एक फार मोठा फरक आहे. औंधाचा राजा इथल्याच मातीतला होता, इथल्या प्रजेच्या सुख-दुःखाशी नातं सांग-णारा होता. राणी एलिझाबेथ मात्र एखाद्या परीकथेतल्या राणीसारखीच अक्षरशः आकाशातून अवतरली आणि इथला पाहुण-चार, मान-सन्मान यथेच्छ उपभोगून पुन्हा निघून गेली. अर्थात यामध्ये तिची चूक नव्हती. लाल गालिचावरून चालत जाणं हे तिच्या रक्तातच आहे. आश्चर्य वाटतं, ते तिच्यासाठी बेभानपणाने हा गालिचा पसर-णाऱ्यांचं. गालिचावरून तरंगत जाणाऱ्या राणीला पाहून कृतकृत्य होणाऱ्यांचं !

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून किती वर्षं झाली, हे इथली पुढारीमंडळी उच्चरवात सतत सांगत असतात. या सम्राज्ञीच्या नोकर-शाहीशी झगडूनच हे स्वातंत्र्य आम्ही मिळ-वलं, असंही आमच्या इतिहासाच्या पुस्तका-मध्ये म्हटलं आहे. त्यामुळे आपल्याला दीडशे वर्षं गुलामगिरीमध्ये पिचवणाऱ्या, इथलं धन विविध मार्गांनी लुटून नेणाऱ्या या सत्ताधीशाबद्दल आज द्वेष राहिला नसला तरी त्यांचं आगमन ही आपल्या उत्कट आनंदाची बाब असू नये, असं कोणाला वाटलं तर त्यात फारसं वावगं नाही; पण राणी आली, तिने पाहिलं आणि आम्हाला पुन्हा एकदा अक्षरशः जिंकलं !

राणीने भारतामध्ये पाय ठेवण्यापूर्वीच इथल्या वृत्तपत्रांमध्ये तिच्यावरील स्तुती-सुम-नांना बहर आला. १५ ते १७ नोव्हेंबर या दोन-तीन दिवसातच देशातील बहुतेक सर्व वृत्तपत्रांमध्ये राणी एलिझाबेथ आणि त्यांचे यजमान प्रिन्स फिलीप यांच्या 'शाही जीवना'ची रसभरित वर्णनं फोटोसह प्रसिद्ध झाली. त्यांच्या बकिंगहॅम राजवाड्याला सहाशे खोल्या आहेत, इथपासून तर त्यांच्या मुलांना सूर मारणे, घोडदौड, पोलो इत्यादी छंद आहेत, येथपर्यंत वाटेल ती माहिती या रकान्यामध्ये भरली गेली. हे करताना, भार-तीय वाचकांच्या सर्वसामान्य ज्ञानामध्ये ही मौलिक भर कशासाठी असा साधा विचारही कोणाच्या डोक्यात आला नसावा. ब्रिटिश दूतावासाकडून जे मिळालं ते इमाने-इतबारे प्रसिद्ध करण्यात आलं. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने तर २१ नोव्हेंबर रोजी चौदा पानांची खास पुरवणी काढून राणीचा स्पेशल जयघोष केला. पुरवणीच्या प्रत्येक पानावर 'व्हिजिट ऑफ क्वीन एलिझाबेथ टू इंडिया' असा आठ कॉलमी मथळा, दर पानाआड राणीचे फोटो आणि स्वागताच्या जाहिराती! कलकत्त्याच्या 'स्टेट्समन'नेही १८ आणि २१ नोव्हेंबरच्या अंकामध्ये अशाच प्रकारच्या चार चार पानी पुरवण्या प्रसिद्ध केल्या. राणीच्या नंतरच्या गाठी-भेटी, दौऱ्याचे फोटो छापताना आणि लांबलचक वर्णनं करताना आमच्या वृत्तपत्रांचे किती रकाने खर्च पडले, याची तर मोजदादच करता येणार नाही.

सतरा नोव्हेंबरला राणीचं आगमन झालं. अठरा नोव्हेंबरचा दिवस तिने दिल्लीत मोठ्या धादलीत घालवला. कार्यक्रमांची गर्दी बरीच होती. दिल्लीतल्या सेंट थॉमस स्कूलला राणीने भेट दिली आणि तिथली मंडळी इतकी धन्य झाली की, त्यांनी राणीची पालखीतून मिरवणूक काढली. 'हिंदू'-'स्टेट्समन'सह अनेक प्रमुख वृत्तपत्रांनी हे

पृष्ठ २३ वर

# राष्ट्रकुलाची जडणघडण

तुकाराम कोकजे

जगाच्या पाचही खंडात ब्रिटिशाचे साम्राज्य पसरले होते म्हणूनच ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळत नाही, असे म्हणत असत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अत सुरू झाला. कारण त्यानंतर आशिया, आफ्रिका व अमेरिका खडातील ब्रिटिशाच्या सत्तेखालील अनेक देश स्वतंत्र झाले. अशा या देशांची संघटना म्हणजेच राष्ट्रकुल.

ज्या ज्या देशात ब्रिटिश सत्ता होती त्या त्या देशाला ब्रिटिश वसाहत म्हणण्याची प्रथा होती. दुसऱ्या महायुद्धानतर ब्रिटिशानी 'वसाहत' या शब्दाचा त्याग केला. ब्रिटिश वसाहतीचा कारभार पाहणाऱ्या कचेरीचे नाव 'वसाहत कचेरी' असे होते, ते बदलून १९४७ मध्ये 'राष्ट्रकुल संबंध कचेरी' असे करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य देणारा कायदा १९४७ मध्ये ब्रिटिश संसदेत मंजूर झाला. त्यात 'दोन वसाहती' निर्माण करण्यात याव्यात, असे म्हटलेले असले तरी व्यवहारातून हा शब्द काढून टाकण्यात आला होता. वसाहतीचा दर्जा असणाऱ्या देशांबाबतही हा शब्द वापरण्याचे बंद करण्यात आले. १९५२ च्या राष्ट्रकुल पंतप्रधानाच्या बैठकीत शाही किताबातूनही 'वसाहत' शब्द काढून टाकण्यात आला.

ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जोखडाखालून स्वतंत्र झालेल्या प्रत्येक देशाने राष्ट्रकुलाचे सदस्य झालेच पाहिजे का? नाही. असे कोणतेच बंधन नाही. सदस्य झालेच पाहिजे असे नाही, इतकेच नव्हे तर सदस्य होऊन नंतर बाहेरही पडता येते. ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य देणारे विधेयक ब्रिटिश संसदेत माडताना ब्रिटिश पतप्रधान अॅटली यानी जे निवेदन केले त्यावरून हे स्पष्ट होते. ते म्हणाले, 'राष्ट्रकुल (ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स) ही मुक्त संघटना आहे. ब्रिटिश सत्तेखालील देशांची ही सघटना नव्हे. राष्ट्रकुलाबाहेर राहून स्वातंत्र्य उपभोगण्याची ब्रह्मदेशाची इच्छा आहे. हिज मॅजेस्टिज सरकारने त्याच्या या इच्छेचा मान राखला पाहिजे' सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर बर्मा दि अर्ल ऑफ लिस्टोवेल यानी उमरावसभेत सागितले, 'राष्ट्रकुलाचे सदस्यत्व कोणावर लादावे अशी आमची भूमिका नाही. हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न आहे.' जे राष्ट्रकुलाचे सदस्य आहेत ते राष्ट्रकुलाशी व इंग्लंडशी संबंध तोडलेल्या देशांइतकेच स्वतंत्र आहेत. इथे आणखी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. भारत व सिलोनला स्वातंत्र्य देण्यासंबंधीच्या कायद्याचे जे शीर्षक होते तेच ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य देणाऱ्या कायद्याचे होते; परंतु ब्रह्मदेशाने राष्ट्रकुलाचे सदस्यत्व स्वीकारले नाही.

### पाकिस्तानने राष्ट्रकुल सोडले

ब्रह्मदेशानंतर १९४९ मध्ये आयर्लंड स्वतंत्र झाला व आयरिश प्रजासत्ताक जन्माला आले. आयर्लंडनेही राष्ट्रकुलात न राहण्याचे ठरविले. पाकिस्तान राष्ट्रकुलाचे सदस्य होते. १९७१ मध्ये पूर्व-पाकिस्तान म्हणजे पूर्व बंगाल पाकिस्तानमधून फुटून बाहेर पडले व स्वतत्र बागलादेश जन्माला आला. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया व न्यूझिलंडने नव्या बांगलादेश सरकारला मान्यता दिली तेव्हा पाकिस्तानने ३० जानेवारी १९७२ रोजी राष्ट्रकुलाचा त्याग केला. १९७० च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी अध्यक्ष भुत्तो यानी पाकिस्तान राष्ट्रकुलातून बाहेर पडेल, अशी घोषणा केली होती. त्याच्याशी सयुक्तिक अशीच ही पाकिस्तानची कृती होती.

सुदानला १९५६ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. सुदाननेही राष्ट्रकुलात न राहण्याचे ठरविले. सोमालीलॅंडचा ब्रिटिश सत्तेखालील भाग व इटलीच्या ताब्यातील परंतु संयुक्त राष्ट्र विश्वस्त विभाग यांचे १९६० मध्ये एकत्रीकरण झाले व स्वतंत्र सोमाली प्रजासत्ताकाचा जन्म झाला आणि सोमालीलॅंडने राष्ट्रकुलात प्रवेश केला नाही. तसेच दक्षिण कमरूनला १९६१ मध्ये स्वातंत्र्य मिळाले व ते शेजारच्या फ्रेंच कमरूनमध्ये विलीन झाले. त्यातून फेडरल रिपब्लिक ऑफ कमरूनचा जन्म झाला. त्यामुळे ब्रिटिश राजवटीखालील दक्षिण कमरूनला राष्ट्रकुलातून बाहेर पडावे लागले. मालदीव बेटे १९६५ मध्ये स्वतत्र झाली; परतु त्यानी राष्ट्रकुलात १९८२ मध्ये प्रवेश केला. ब्रिटिश सत्तेखालून मुक्त झालेल्या अनेक छोट्या देशानी राष्ट्रकुलाचे सदस्यत्व स्वीकारले नाही. जगातील ४८ स्वतंत्र राष्ट्रे राष्ट्रकुलाची सदस्य आहेत.

भारत, पाकिस्तान, सिलोन १९४७ मध्ये स्वतत्र झाले व त्यानी राष्ट्रकुलात राहण्याचे ठरविले. त्यानंतर दहा वर्षांनी १९५७ मध्ये घाना व मलायातून ब्रिटिशानी पाय काढला व हे दोन देश स्वतत्र झाले. दोघानीही राष्ट्रकुलात राहण्याचे ठरविले. त्यानतर जवळजवळ दर वर्षी एक–दोन तरी देश ब्रिटिश साम्राज्यातून मुक्त होत होते व त्यापैकी बहुतेकानी राष्ट्रकुलात राहण्याचे ठरविले. –१९६०सायप्रस व नायजेरिया,१९६१–सिरा लिओने व टागानिका, १९६२–जमैका, त्रिनिदाद आणि टोबॅगो व युगाडा, १९६३–झाझिबार आणि केन्या, सबाह, सारावाक आणि सिंगापूर (मलेशियाचे भाग म्हणून), १९६४–मालावी, माल्टा व झाबिया, १९६५–गाबिया, १९६६–गियाना, बोटस्वाना, लेसोथो व बार्बाडोस, १९६८–नौरू, मॉरिशस व स्वाझिलॅंड, १९७०–टोगावफिजी, १९७३–बहामास, १९७४–ग्रेनाडा, १९७५–पपुआ न्यू गिनी, १९७६–सेचेलिस, १९७८–सॉलोमन बेटे, तुवालू व डॉमिनिका, १९७९–सेंट लुसिया, किरिबती, सेट व्हिन्सेंट अॅंड द ग्रेनाडाइन्स, १९८०–झिबाब्वे व वानुटू, ११८१–बेलिझे, अॅंटिगुआ आणि बरबुडा अशा प्रकारे ४८ देशाची ही संघटना झाली.

### एका तत्त्वाशी बांधिलकी

राष्ट्रकुल हो स्वतत्र प्रजासत्ताक देशांची सघटना आहे प्रत्येक देशाने आपआपली धोरणे ठरवावयाची असतात; परतु त्या देशातील लोकाच्या हिताचे प्रश्न एकमेकाशी विचारविनिमय करून सोडविण्याचा प्रयत्न असतो. तसेच आतरराष्ट्रीय सामंजस्य व

जागतिक शातता–स्थापनेसाठी ही संघटना कटिबद्ध आहे.या संघटनेत विविध वशाचे, रगाचे व भाषांचे लोक आहेत सघटनेतील श्रीमत, औद्योगिक देश गरीब, विकसनशील देशाना आर्थिक विकासात मदत करतात. या देशाची संस्कृती व परंपरा उच्च आहे. राष्ट्रकुलाचे सदस्यत्व स्वीकारल्यानंतरही कोणत्या एखाद्या गटात जावयाचे की, तटस्थ रहावयाचे याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य या देशाना आहे तरीही ही सर्व राष्ट्रे एका तत्त्वाने बाधलेली आहेत त्या तत्त्वाचा पाठपुरावा करून राष्ट्रकुल मानवाच्या कल्याणार्थ आतरराष्ट्रीय प्रभाव पाडू शकते. ही तत्त्वे–

'मानवाच्या सरक्षण आणि भरभराटीसाठी आतरराष्ट्रीय शातता व सुव्यवस्था आवश्यक आहे, असा आमचा विश्वास आहे.

'आणि म्हणून आमचा सयुक्त राष्ट्राना पाठिबा आहे व जागतिक शाततेसाठी त्याचा प्रभाव वाढावा यासाठी ती बलवान व्हावी असेही आम्हाला वाटते. त्याचप्रमाणे आतरराष्ट्रीय तणाव कमी करण्याच्या प्रयत्नात त्याना यश लाभावे, असेही वाटते.

'व्यक्तिस्वातंत्र्य, वश, वर्ण, जमात किंवा राजकीय विचार ध्यानात न घेता सर्वांना समान हक्क आणि ज्या समाजात ते राहतात त्या समाजाची घडण स्वतत्र व लोकशाही मार्गाने करण्याचा त्याचा हक्क, यावर आमचा विश्वास आहे तेव्हा आमचे सदस्य असलेल्या प्रत्येक देशात कायद्याने व्यक्तिस्वातंत्र्य देणारी प्रातिनिधिक सस्था निर्माण करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे आम्ही मानतो

'मानवाच्या निकोप विकासाला वशभेद हा मोठा धोका आहे व समाजावर ते एक अरिष्ट आहे,असे आम्ही मानतो आमच्या देशात आम्ही त्याविरुद्ध लढा देऊ वशभेद मानणारी राजवट कोणत्याही देशाला परवडणार नाही. कोणत्याही प्रकारचा वसाहतवाद व वश आक्रमणास आमचा विरोध आहे. मानवी प्रतिष्ठा व समानता याला आम्ही बाधील आहोत. तेव्हा त्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू. तसेच स्वयनिर्णय व वशभेदविरोध ही तत्त्वे अमलात आणण्याचा आम्ही प्रयत्न करू.

'मानवाच्या विविध विभागात जी भयानक आर्थिक विषमता आहे ती सहन करण्यापलिकडे आहे. त्यामुळे जागतिक तणाव निर्माण होतात. ती विषमता हळूहळू कमी करणे हे आमचे काम आहे. तेव्हा गरिबीवर मात करण्याचा आम्हाला प्रयत्न केला पाहिजे. तसेच अज्ञान व रोगावर विजय मिळविला पाहिजे. जीवनमान सुधारून समान आतरराष्ट्रीय समाज निर्माण करण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. त्यासाठी सर्वांना योग्य व समान अटीवर आंतराष्ट्रीय व्यापार साधण्याचे ध्येय आम्हाला गाठले पाहिजे. त्यासाठी विकसनशील देशाच्या खास गरजा ध्यानात घ्याव्या लागतील. त्याना सरकारी व खासगी क्षेत्रातून पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा लागेल, आणि भागीदारीच्या दृष्टिकोनातून विकसनशील देशात सतत गुतवणूक व वाढ होईल अशी परिस्थिती निर्माण करावी लागेल.

'युद्धाची कारणे नष्ट करण्यासाठी, सहनशीलता वाढविण्यासाठी, अन्याय दूर करण्यासाठी व जगातील सर्व लोकांचा विकास साधण्यासाठी आतरराष्ट्रीय सहकार्याची गरज आहे, असे आम्हाला वाटते व त्यासाठी राष्ट्रकुल ही एक उत्कृष्ट सघटना आहे, अशी आम्हाला खात्री वाटते.

'राष्ट्रकुलाची सदस्य राष्ट्रे या तत्त्वांचा पाठपुरावा करून आधुनिक जगात शातता व विकासासाठी आवश्यक असलेल्या बहुदेशीय दृष्टिकोनाचे एक उत्कृष्ट उदाहरण घालून देतील. सल्लामसलत, चर्चा व सहकार्य हा या सघटनेचा पाया आहे. प्रत्येक सदस्य राष्ट्राचे परकी आक्रमणापासून सरक्षण,ही सर्व सदस्याच्या चितेची बाब ठरते. व्यावसायिक, सास्कृतिक, आर्थिक, कायदा व राजकीय प्रश्नावर विचाराची देवाणघेवाण होते. त्यामुळे ज्ञानप्राप्तीचे अनेक मार्ग उपलब्ध होतात. हे नाते सतत वाढविण्याचा आमचा प्रयत्न असतो. कारण आमची ही बहुदेशी संघटना माणसामाणसामधील व देशादेशामधील सामजस्य वाढवू शकेल वश, वर्ण, जमात यावर आधारित भेदाभेद नष्ट करण्यास मदत करील. व्यक्तिस्वातंत्र्य राखील व वृद्धिगत करील सर्वांचा जीवनदर्जा उचावील व देशादेशामध्ये शातता टिकविण्यास प्रभावी मार्ग ठरेल '

उपरनिर्दिष्ट जाहीर घोषणेवरून राष्ट्रकुलाचा उद्देश व धोरण काय आहे, हे ध्यानात येते. राष्ट्रकुल सदस्य देशाच्या प्रत्येक बैठकीत परिस्थितीनुसार त्यात बदल झाले व अनेक नव्या गोष्टींची भरही पडली परतु मूळ उद्दिष्ट जागतिक शातता व मानवाचा सर्वांगिण विकास, यात तसूभरही बदल झाला नाही. सर्व प्रकारचे व सर्व स्तरावर आतरराष्ट्रीय सामजस्य व सहकार या ध्येयात बदल झाला नाही.

## मेलबर्न घोषणा

ऑस्ट्रेलियात मेलबर्न येथे १९८१ मध्ये राष्ट्रकुलातील देशाच्या प्रमुखाची बैठक झाली. त्यात सोळा कलमी घोषणा करण्यात आली.

(१) सर्व स्त्री–पुरुषाना मानवी प्रतिष्ठेचे संवर्धन होईल अशा तऱ्हेने आपले जीवन जगण्याचा हक्क आहे, अशी आमची दृढ व एकमताची समजूत आहे.

(२) या समजुतीमुळे सर्व लहान-मोठ्या राष्ट्रांवर त्याच्या स्वतःच्याच लोकाबाबत केवळ नव्हे, परतु इतर देशाशी सबध येतो तेव्हाही या हक्काचे पालन करण्याची जबाबदारी आहे

(३) वित्त आणि संधी याबाबत जगात जी विषमता आहे व दारिद्र्याच्या दुष्ट चक्रात विकसनशील देशातील लाखो लोक सापडले आहेत. त्यामुळे जगातील,तणाव आणि अस्थिरता वाढते आहे, असे आम्हाला निश्चित वाटते.

(४) तेव्हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ही विषमता व हे दुष्ट चक्र भेदण्याचे निश्चित प्रयत्न निष्ठेने झाले पाहिजेत.

(५) त्यासाठी विकसित व विकसनशील देशातील सुसंवाद वाढला पाहिजे.

(६) त्यासाठी राजकीय वचनबद्धता, स्पष्ट दृष्टी, बौद्धिक वास्तवता याची आवश्यकता आहे, असे आम्ही जाहीर करतो. कारण मानवाच्या नजरेतून या गोष्टी सुटल्या आहेत आणि राष्ट्रकुल त्यांत महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल असे आम्ही जाहीर करतो.

(७) सध्या आपल्यापुढे असलेल्या समस्याची तातडी लक्षात घेऊन वास्तव व सार्थ बदल, स्वीकारून प्रामाणिकपणे सुसवाद साधला पाहिजे.

(८) बदल व स्थिरता यातून निवड करावयाची नसून वेळीच; योग्य व ठरवून बदल आणि संघर्ष व नाशातून लादलेला बदल यात निवड करावयाची आहे.

(९) लोकाच्या व देशाच्या अतर्गत स्वातंत्र्याला योग्य ते महत्त्व

पृष्ठ २४ वर

## साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद

# या वर्षी नको, पुढच्या वर्षी बघू हे किती वर्षे चालणार?

नेहमीच्या सार्वत्रिक निवडणुकांत आपल्यासारख्या वाङ्मयप्रेमी, रसिक-साहित्यिक वगैरे मंडळीची कुठेच गणती नसल्याने साहित्यसमेलन, नाट्यसंमेलन अशासारख्या सास्कृतिक वगैरे संस्थाच्या निवडणुका आल्या की, आपल्याला काही औरच हुरूप येतो. साहित्यसंमेलनाची अध्यक्षीय निवडणूकसुद्धा अशीच एक आपला निवडणुकीसंबंधीचा उत्साह शमवून घेण्याची सधी आहे.

— तसे नसते तर साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाची निवड एकमताने होऊ द्यावी यासबधी इतकी वर्षे बोलले जात असताना-देखील निवडणुका घेण्याची पद्धत कायमच का ठेवली ?

— या निवडणुका जाहीर होणे, त्याबद्दल मग वाद–विवाद, नाव मागे घेणे, दबावाचे वगैरे ‘राजकारण’, लुटुपुटीचा सस्पेन्स, रुसवे-फुगवे ही दरवर्षीची प्रथाच आहे.

— या वर्षीच्या निवडणुका अशाच ‘संघर्षा’ चा पडघम वाजवीत आल्या आहेत. शैलीदार कवी बा. भ. बोरकर व संयत रीतीने आत्माविष्कार करणारे ज्येष्ठ दलित साहित्यिक शंकरराव खरात यांच्यात मुख्यत्वे ही लढत आहे. ग्रामीण साहित्यातले एक ‘मेजर रायटर’ ग ल. ठोकळसुद्धा यासाठी उभे आहेत. बोरकर उभे आहेत म्हटल्यावर शकर पाटलानी आपले नाव मागे घेतले. तिकडे मुबईचे ‘लोकसत्ता’चे विद्याधर गोखले यांनी बोरकर उभे राहिले तर त्याना विरोध करण्यासाठा मी उभा राहीन, अशी घोषणा केली होती; पण तसे काही त्यांनी केले नाही.

— तर एकंदर अशी परिस्थिती

जळगाव समेलनाच्या अध्यक्षपदी या वेळी तरी निदान दलित साहित्यिक असावा, अशी भूमिका पुण्याच्या मराठी साहित्यपरिषदेचे कार्याध्यक्ष श्री. ग. वा. बेहरे यानी घेतली.त्या दृष्टीने त्यानी खराताचा पुरस्कार सुरू केला. दलित साहित्यिकांमधील एकहीजण आतापर्यंत साहित्यसमेलनाचा अध्यक्ष होऊ शकला नाही. चंद्रपूरच्या अधिवेशनात प्रा गंगाधर पानतावणे अध्यक्षपदासाठी उभे असतानाच ‘वऱ्हाडी’ वामन चोरघडे निव-डून आले ते अट्टाहासानेच! पानतावणे सयमी व सुजन असल्याने त्यानी चंद्रपूर समेलनात भाग घेतला व काही जणाच्या अत्युत्साहाला आवर घालण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर बार्शी, अकोला, रायपूर, अंबा-जोगाई इत्यादी संमेलने झाली. इथे सर्वत्रच सरदार, दाडेकर, गाडगीळ, माडगूळकर ही मडळी अध्यक्षस्थानी होती. दरम्यान दलित साहित्यिकांत व आविष्कारकर्त्यांमध्ये मराठी प्रवाहापासून वेगळे होण्याची प्रवृत्ती जोर धरत होती. अशा वेळी दलित साहि-त्यिकांना जर अध्यक्षपदाचा मान मिळाला तर युक्तच होईल, असा खरातांची उमेद-वारी सुचविण्यामागचा सकृद्दर्शनी दिसणारा विचार.

मराठी साहित्य महामडळाचे व मराठ-वाडा साहित्यपरिषदेचे अध्यक्ष प्राचार्य गजमल माळी हे स्वत: खरातांच्या बाजूने आहेत. मात्र अध्यक्षाच्या मर्यादा म्हणून ते फारसा प्रचार करीत नाहीत.

बोरकराची उमेदवारी सुचविली गेली ती प्रामुख्याने मराठवाड्यातून. खरे तर माडगूळकराच्याऐवजी अंबाजोगाईला बोर-करच अध्यक्ष व्हायचे; परंतु तात्रिक मुद्द्या-मुळे त्यांचे नाव सुचविले गेले नाही. त्या-नंतर खुद्द व्यकटेश माडगूळकरांनीच पुढच्या अधिवेशनाला बोरकर अध्यक्ष असावेत, अशी इच्छा व्यक्त केली. तेव्हापासूनच बोरकरांच्या अध्यक्षपदासाठी मोर्चेबंदी चालू आहे लढत झाली ती बोरकर–खरात अशी !

### मराठवाड्यातील डावपेच

या सर्व गोष्टीमागे अनेक निरगाठी, गोफ आहेत. सुरवातच होते ती मराठवाडा साहित्यपरिषदेतल्या अंतर्गत राजकारणा-पासून. नरहर कुरुंदकर जेव्हा परिषदेचे अध्यक्ष होते त्या वेळी सर्व गटाना साभाळून घेतले जात होते. कुरुंदकर गेल्यानंतर मात्र लाथाळ्या दिसू लागल्या.

प्रा. गजमल माळी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष होते. नागपूरच्या आष्टी-करांनतर (विदर्भ साहित्य संघ) महा-मंडळाचे अध्यक्षपद मराठवाड्याकडे चालून आले. या वेळी महामंडळाचा कारभार पार विस्कटला होता. अनिलांनंतरच्या आष्टी-करांनी आपल्या अलगतेच्या गर्जना सुरू केल्या होत्या. त्या वेळी प्रा माळी याच्या-सारखा माणसे हाताळण्यात व वळवून घेण्यात कुशल असलेला, साहित्यिक व ॲकॅ-डॅमिक पार्श्वभूमी असलेला माणूस महा-मडळाच्या अध्यक्षपदी असणे पुण्याच्या व मुंबईच्या महामंडळावरील लोकाना इष्ट वाटले. खुद्द माळीनाही त्या वेळच्या मराठ-वाडा साहित्यपरिषदेतून (मसाप) बऱ्याच सदस्यांचा पाठिंबा होता. मात्र त्या वेळी मसापमधल्या एका ताकदवान गटाचे (त्याला समाजवादी म्हणा किंवा मराठवाड्यातील प्रस्थापित म्हणा) मागणे होते की, माळीनी एक तर महामडळाचे अध्यक्ष व्हावे किंवा मसापचे तरी रहावे. दोन्ही अध्यक्षपदे त्यांनी घेऊ नयेत. या वेळी मसापचे सरचिटणीस प्रा. तु शं. कुलकर्णी होते. त्यानी व त्याच्या पाठिराख्यानी खूप धडपड केली. मात्र प्रा. माळी महामडळाचे अध्यक्ष झालेच; ते पुणे–मुबई–मराठवाडा–विदर्भ या संलग्न सस्था-तील पदाधिकाऱ्याच्या संयुक्त पाठिंब्यावर. पुढे मसापच्या अध्यक्षपदाचा प्रश्न माळीनी टागता ठेवून आजतागायत ही दोन्ही पदे आपल्याकडेच ठेवली आहेत. याचा

दुसऱ्या गटाला राग येणे साहजिकच आहे त्याखेरीज प्रा. माळी याच्यासंबंधी अनेक तक्रारी आहेत वैयक्तिक सत्ता वाढविणे, आपली माणसे भरणे, सर्व गोष्टी आपणच करतो असे दाखविणे व प्रत्यक्षात दुसऱ्याकडून कामे करवून घेणे वगैरे नाना तक्रारी माळीविरुद्ध आहेत.

दुसरीकडे प्रा. माळीसुद्धा आपले सामर्थ्य कशात आहे ते जोखून आहेत. अध्यक्षपदावर आल्यापासून त्यानी आपले स्वतंत्र सामर्थ्य वाढविण्यास सुरुवात केली. त्यानी एक केले आपल्या माणसे हाताळण्याच्या कौशल्यामुळे महामडळात थोडी स्थिरता आणली. एक सिस्टिम आणली. मात्र ते दुसऱ्या गटाला मान्य नाही !

या दोन गटात शीतयुद्ध चालूच आहे. त्याच्या कारणमीमासेचा स्वतंत्र ग्रंथच होईल. लक्षात ठेवण्याची एकच गोष्ट म्हणजे, मसापमध्ये ही फूट आहे. या फुटीचे परिणाम अंबाजोगाईच्या समेलनातही दिसले.

तु. शं. कुलकर्णी गटाने माडगूळकरांचे नाव सुचविले. माळींनी रमेश मंत्रीचा आतून प्रचार केला. मग या प्रस्थापित गटाने ऐन संमेलनाच्या आदल्या दिवशीच 'प्रा. माळी संमेलनाचा निधी जमवू शकले नाहीत' अशी तोफ डागली.

अशा प्रकारची झटापट आजपर्यंत चालू आहे. गंमतीची गोष्ट अशी की, प्रा. माळी काँग्रेस (आय) चे कार्यकर्ते म्हणवितात. त्यांचे विरोधक हे सगळे समाजवादी !

## कुरघोडीचे प्रयत्न

एकदा या समाजवादी म्हणविणाऱ्या गोटाने बोरकरांचे नाव सुचविल्यावर साहजिकच प्रा. माळी यांनी शंकरराव खरातांच्या उमेदवारीला उचलून धरले. यामुळे या 'समाजवादी' मंडळीचे खरे स्वरूप उघडे होईल, असा त्याचा कयास असावा ! खरातांच्या उमेदवारीला पाठिबा देण्यामागे माळींची वैचारिक भूमिका काही नाही, असे येथे सुचवायचे नाही. ती त्यांनी माडलीही आहे. परंतु एक गटातर्गत संघर्षाचाही याला वास आहे हे खरे.

मसापमधील महामंडळावर असलेले बहुसंख्य सभासद आज प्रा. माळीच्या विरोधात आहेत—म्हणजे बोरकराच्या बाजूचे आहेत. त्यांचा माळीवर आरोपच आहे—खरातांना उभे करण्यामागे विशुद्ध सामाजिक हेतू नाही, तर राजकारण आहे. त्या राजकारणाला आमचा विरोध आहे; खरातांना विरोध नाही ! असे या गटाचे म्हणणे. म्हणजे काय कुणास ठाऊक !

## मुंबई, पुणे, जळगाव इत्यादी

मराठवाड्याची ही परी, तर मुबईची दुसरीच गमत. मुबई मराठी साहित्य संघाने बोरकरानाच पाठिबा द्यायचा ठरविलेले आहे यात मसापसारखे गटाचे राजकारण नाही, तर सपूर्ण मुबई मराठी साहित्य संघाने एक गठ्ठा बोरकराना निवडून आणायचे ठरविल्यासारखे दिसते. त्यामुळे बोरकराविरुद्ध उभे राहून काही उपयोग नाही, असे मुबईस वाटते.

पुण्याची बेहरे, जोशी, दीक्षित, फडणीस ही मंडळी खराताच्या बाजूची· विदर्भ साहित्य संघावर मात्र हे दोन्ही गट आपापला दावा सांगताहेत ! वि. सा स. अध्यक्ष राम शेवाळकर व प्रा. माळी हे समान विरोधकीमुळे (आष्टीकर) मित्र आहेत. चंद्रपूरला प्रा. पानतावण्याचे नाव शेवाळकरानीच सुचविले होते.

एवढे पुरे नाही म्हणून की काय, जळगावच्या समेलनाच्या कार्यकारी समितीचे मतही फार महत्त्वाचे आहे. या संमेलनाचा डोलारा सांभाळणारे माजी मंत्री श्री. मधुकरराव चौधरी आहेत. त्याचे मत काय ते निश्चित माहित नाही. मात्र दोन्ही गट म्हणतात की, बाळासाहेबांना (चौधरी) आमच्यासारखेच वाटते. जळगाव जिल्ह्यातल्या ना. प्रतिभाताई पाटील या प्रकारात कुठेच दिसत नाहीत ! जळगाव संमेलनाचे आणखी एक अध्वर्यु ना. धों. महानोर त्यांना बोरकर अध्यक्षपदी पाहिजेत, असे महावीर जोंधळे (औरंगाबाद) म्हणतात. तर स्वागत समितीच्या चिटणीसापासून इतर सर्व पदाधिकारी प्रा. माळीबरोबर दिसतात.

मध्यतरी बोरकर व खरात या दोघानीही आपली नावे मागे घेऊन डॉ. गगाधर पानतावणे यांची एकमताने निवड व्हावी, या दृष्टीने औरगाबादेत थोडी हालचाल झाली होती. मात्र ती तात्पुरतीच. डॉ. पानतावण्यांनी स्वतः मागे औरंगाबादेत कोल्हापूरचे सामाजिक सत्यशोधक भाई माधवराव बागल याना जळगावला अध्यक्ष करावे, अशी सूचना केली होती !

एकंदर मतदान होईपर्यंत ही पारडी वरखाली होत राहतील, हे निश्चित. पुण्यातली वृत्तपत्रसृष्टी व मुबईतली वृत्तपत्रेसुद्धा आताशा या प्रश्नी निश्चित भूमिका घेत नसली तरी पुण्याचे बरेच सपादक खरातांच्या बाजूने उभे राहणार असा रंग दिसतो.

आपल्याकडल्या लग्नात अजूनही नवरानवरीपेक्षा सासू-सासरे, बहिणी, करवल्या, पाव्हणे—रावणे याचाच फार बडेजाव असतो. त्यानाच महत्त्व असते व त्यांच्यातच आपसात काही ठरत असते. बिचारे नवरानवरी दुसरे काय ठरवतात याकडे असहायतेने पाहतात. तसाच प्रकार आपल्याकडच्या साहित्यिक निवडणुकात हल्ली होत आहे.

बोरकर—खरात—ठोकळ याना काय वाटत आहे त्यापेक्षा माळी, तु शं कुलकर्णी, सुधीर रसाळ, राम शेवाळकर याना काय वाटते ते महत्त्वाचे आहे

या निवडणुकीत ग. ल. ठोकळ याचेही नाव आहे. त्याचे ग्रामीण साहित्यातील एक स्थान, संघटनात्मक काम, संपर्क मोठा आहे. मात्र त्याच्यामागे लॉबी नाही. ते जास्तीत जास्त इतर दोघाची मते खाऊ शकतील एवढेच.

शकरराव खरातांकडे आजमितीला तरी साहित्य महामंडळातील ज्येष्ठ व कार्यकर्त्या मंडळीचा पाठिबा आहे. प्रा. पानतावणे याना नाकारलेली सधी परत एका दलित साहित्यिकाला देण्याची संधी आलेली आहे, अशी भावना त्यांना उपयोगी पडते. बोरकरामागे मराठीतली समस्त 'दर्जेदार' लेखकमंडळी, असतुष्ट सदस्य, प्रकाशक, समीक्षक याचा ताफा आहे. कोणीच माघार घेत नाही.

## साहित्यिक निकष

हे झाले राजकारण. निवड करताना या राजकारणाकडे दुर्लक्षच करावे. प्रत्यक्ष साहित्यिक मूल्यांच्या दृष्टीने पाहिले तर हीच संभ्रमावस्था आहे.

बोरकर कोकणी कवी म्हणून स्वत.ला मानतात. हा त्यांच्या विरोधकाचा आक्षेप बाजूला ठेवावा. तो गैरलागू आहे.

मराठी काव्याला कोवळेपण, मुलायम, तरल जाणिवांचे व देखण्या शब्दकळेचे देणे त्यांनी दिले. 'मेजर पोएट' आणि 'मास्टर पोएट' अशी त्यांची ख्याती आहे. माणूस म्हणून व समाजातील एक घटक म्हणून व्यक्तिशः बोरकर सर्वांनाच प्रिय आहेत.

'गडद निळे जलद' पाहून सुखावून जाणारे बाकीबाब प्रत्येकाच्या आयुष्यातल्या चित्रांची विचित्रवीणा छेडत असतात. आताशा कुठे आवळीवरचा कावळा त्यांना मावळतीचा शकून सांगत आहे. आयुष्यभर मी कवी म्हणून जन्मलो या धुंदीतच–जाणिवेतच–जगलेले बोरकर त्याच मस्तीत मरणाला सामोरे जातात. अजूनही यौवनात राहून प्रत्येक सौंदर्याला दाद देतात, त्याचा आदर करतात; पण सध्यारागात हरवून अनंताची आस लागलेली सांगावी ती त्यांनीच.

एक परिपूर्ण साहित्यिक – (लिटरेचर इन्कार्नेटेड) म्हणून बोरकरांकडे बोट दाखवावे लागेल. आता संध्याछायाही त्यांच्या अवतीभवती फिरताहेत. साहित्य समेलन अध्यक्षपद त्यांच्याकडे चालून यायला पाहिजे, असे अनेकांना वाटणे साहजिक आहे.

हे सर्व खरे आहे.

परंतु खरातांच्या बाजूनेही असा विचार करता येणार नाही का? त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला तर दुहेरी धार आहे. वैयक्तिक व व समष्टीगत. आयुष्य दुःखात होरपळलेलं. कित्येक अनुभवातून ते गेले, अनुभव पचविले आयुष्याचे चढउतार, कडक उन्हे त्यांनी पाहिली. या सर्व चटक्यातून त्यांनी आपला साहित्यप्रपंच निष्ठेने उभवला. उत्कट अनुभव असलेली व्यक्ती आपल्या भावनांचे प्रदर्शन करीत नाही. एका तऱ्हेच्या उदासीतून (मेलॅन्कली), संयतपणे हा अनुभव शब्दरुप होतो. समजूतदारपणा, सर्वांना सामावून घेण्याची वृत्ती आणि नेहमीच्याच छापील विश्लेषणाहून वेगळी अशी स्वतःची विश्लेषणपद्धती अशा अनुभवातून गेलेल्या व्यक्तीकडे असतात. शकरराव खरातांचे व्यक्तित्व व साहित्य या दर्जाचे आहे.

खरात दलित साहित्यिक आहेत म्हणूनही त्याचे महत्व वाढते. अखेर या साहित्याला आपण स्वीकारणार की नाही? प्रा. पानतावणे एकदा उभे राहिले– त्यांना पाडले! कोणत्या कारणावरून? तर साहित्यिक, प्रादेशिकदृष्ट्या दुसरा उमेदवार श्रेष्ठ आहे म्हणून. दलित साहित्यिकाना आम्ही अध्यक्षपदी बसवूच. पण यावेळी नको, पुढल्यावेळी बघू. असे किती दिवस चालणार? दलित साहित्यिक अध्यक्षपदासाठी उभा राहिला तर त्यावेळी बिगरदलित, कुणी तरी ज्येष्ठ तपस्वी इत्यादी साहित्यिक उभा राहणारच. त्यावेळीसुद्धा दलित साहित्यिकाची संधी जाणारच का?

दलित साहित्यिकाला अध्यक्षस्थान देऊन आपण त्यावर उपकार करत नाही. दलित लेखक तर आता मराठीच्या तथाकथित 'मुख्य प्रवाहाशी' फारकतच घ्यायला निघालेले आहेत. प्रश्न आहे साहित्य संमेलनाने याची जाणीव ठेवावी की नाही?

खरात हे खरे दलित साहित्यिक नाहीतच, असा निष्कर्ष शंकर पाटील यानी काढला. तो कशावरून? फक्त आक्रस्ताळेपणा, विद्रोह, हीच दलित साहित्याची लक्षणे एवढीच त्यांच्यासारख्याची मर्यादित दृष्टी असेल तर त्यानी प्र. ई. सोनकाबळे, नामदेव ढसाळ, माधक कोंडविलकर, उत्तम तुपे, योगीराज वाघमारे इत्यादींचे साहित्य अधिक निरखून पहावे. एक प्रकारचा सोशिकपणा, विधायकता, समजूतदारपणा, नवनिर्मितीची प्रेरणा, 'कलात्मक' प्रामाणिकता यासारखी सर्व मूल्ये याही साहित्यात आहेत. शंकररावानी आपला विद्रोह, विधायकता वेगळ्या भाषेत सागितले इतकेच.

खरातांची निवड म्हणजे दलित प्रेरणेला गप्प बसविणे वगैरे असेही असेल. मुद्दा हा आहे की, याला हरकत कसली? निदान ही गोष्ट तरी होऊ द्यावी.

बोरकर–खरात याच्यात साहित्यिक मूल्यदृष्ट्या डावे–उजवे ठरविण्यात अर्थ नाही. खरातांच्या अनुभवाचा पल्लाही विस्तृत आहे. ते एकवेळ गृहीत धरले नाही तरी, सामाजिक आशयाच्या दृष्टीने तरी खरात योग्य नाहीत का?

नेहमी दलित साहित्यिकाना 'पुढच्या वेळी पाहू' म्हणण्याऐवजी यावेळी बोरकरांना का तसे म्हणू नये? बोरकरही आपलेच आहेत!

'वळून बघता मागे आता
घडले तेचि पसंद'

म्हणणारे आनंदयात्री बाकीबाब ही सर्व बाबही मनावर घेतील, असे वाटत नाही.

—संजय संगवई

---

**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते, ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखें करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—ग. रा. जाधव
(केसरी, रविवार, ६–२–८१)

# आंबेडकर भारत

लेखक : बाबुराव बागुल
राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : २० रुपये.

# चर्चचे भारतीयकरण....

अजित कानिटकर, त्रिवेंद्रम

गेल्या सुमारे १०–१५ वर्षात 'चर्चचे भारतीयकरण झाले पाहिजे.' या अर्थाचे मतप्रवाह ख्रिश्चन धर्मगुरुंच्या ज्या वेगवेगळचा परिषदा-सभा होत आहेत त्यामध्ये चर्चेस येत आहेत. काही ठरावही या सभामध्ये समत केले आहेत. केरळ राज्य या विचारामध्ये अग्रेसर आहे, असे म्हटल्यासही काही वावगे होणार नाही. भारतातील कॅथोलिक ख्रिश्चन सर्वांत जास्त सख्येने केरळात आहेत. वेगवेगळचा माध्यमातून हे 'भारतीयकरण' सुरूही झाले आहे. एर्नाकुलम्चे कार्डिनल जोसेफ पॅरॅकट्टिल हे या मोहिमेचे अध्वर्यू The church in India and cultural integration या एर्नाकुलम् येथून १९७१ मध्ये प्रकाशित केलेल्या एका पुस्तिकेत कार्डिनल पॅरॅकट्टिल या 'भारतीयकरणाची' आवश्यकता का हे सागतात–

'The church in India must be a Church rooted in Indian soil, thoroughly at home in her various languages culture and ways of life, intimately sharing the joys and hopes, griefs and anxieties of the Indian people and acknowledged by them, not as foreign but very much as their own.'

पुस्तिकेत पुढे लिहिले आहे–

'If Christanity has not succeeded in penetrating into the cultural and religious milieu of our country, if she has failed to make her own impact on the masses... if Christianity has to make headway in the nationalistic India of today, she should no longer appear to be a foreign religion, out of tune with the genius of India.'

सारांशात, येथील बहुसंख्येने ख्रिश्चन धर्म अजूनही आपलासा केलेला नाही, जनसामान्याना त्यामधील पद्धती परक्या वाटतात, हे अंतर कमी करण्यासाठी आणि सर्वसामान्याना ज्यामुळे भुरळ पडेल अशा सर्व स्थानिक चालीरिती-पद्धती ख्रिश्चन धर्मात आणल्या पाहिजेत याचा अर्थ 'भारतीयकरण !'

ख्रिश्चन धर्मगुरुंच्या एका परिषदेने बऱ्याच उलट-सुलट चर्चेनंतर एका ठरावाद्वारे हे 'भारतीयकरण' कसे करायचे याची अगदी पद्धतशीर यादीच तयार केली आहे.

जमिनीवर बसून प्रार्थना केलेली चालेल, हात जोडून नमस्कार करायला हरकत नाही, चर्चमध्ये जाताना चपला काढून गेलेले चालेल, हिंदू पूजा पद्धतीतील 'धूप–दीप–नैवेद्यम्' चा स्वीकार करायला हरकत नाही, मेणबत्तीऐवजी समई चालू शकेल, चर्चमध्ये धूप फिरविणेही चालेल, दैवतासमोर फळे–फुले वाहणे; नारळ फोडणे अशा पद्धतीही स्वीकारलेल्या चालतील इ. इ.

काही चर्चमध्ये 'असतो मा सद्गमय ..' अशा श्लोकाचीही भर प्रार्थनेमध्ये घातली गेली आहे. ॐ येशू ख्रिस्ताय नमः, ॐ मेरीपुत्राय नमः अशाही प्रार्थना काही ठिकाणी होतात.

'ज्योतिनिलयम्', 'गर्वोदय विद्यालय', 'निर्मला भवन' या नावाच्या शाळा, महाविद्यालये, अनाथगृहे चालविण्यात येत आहेत. कन्याकुमारी येथील चर्चचे नाव आहे 'पुनीत माता उपकार चर्च.' त्रिवेंद्रममधील एका ख्रिश्चन शाळेचे बोधवाक्य आहे– तमसो मा ज्योतिर्गमय (ज्योती म्हणून मात्र मेणबत्ती दाखवली आहे!) ख्रिश्चन मुला–मुलींची नावे जॉन, थॉमस अशी असतातच; पण त्याच बरोबरीने संजय, विजय, निर्मला, देवदास अशी 'भारतीय' नावेही सर्रास आढळतात. त्रिवेंद्रमहून कन्याकुमारीस जाताना तमिळनाडूत किमान पाच तरी अशी 'भारतीय' पद्धतीने बाधलेली चर्चेस् आहेत की ज्याच्यासमोर हिंदु मंदिरासमोर असतो त्याप्रमाणे ध्वजस्तभ आहे. (ध्वजस्तंभावर येशूचा पुतळा आहे, ही गोष्ट वेगळी.) अगदी अलीकडे भगव्या झग्यातील धर्मोपदेशक व भगव्या साडीतील स्त्री धर्मप्रचारिका केरळात वेगवेगळचा ठिकाणी दिसतात.

हे 'भारतीयकरण' सर्व क्षेत्रात झाले पाहिजे. नृत्य हे क्षेत्र त्याला अपवाद असून कसे चालेल? काही वर्षांपूर्वी केरळचे जे प्रसिद्ध लोकनृत्य 'कथाकली' त्यामध्ये ख्रिश्चन कलाकार अभावानेच दिसत. (कारण कथाकलीच्या बहुतेक सर्व कथा रामायण–महाभारतातील असत.) आता मात्र अनेक ख्रिश्चन युवक कथाकलीच्या पथकात दिसतात. अगदी गेल्या वर्षीच्या ओणम् कार्यक्रमात अशा एका कलाकाराने 'येशू वधाचा प्रसंग' कथाकली नृत्याद्वारे सादर केला व याबद्दल त्याचे विशेष कौतुकही झाले. २ ऑक्टोबरला गाधी जयंतीच्या दिवशी एका संस्थेने योजलेल्या परिसंवादास गेलो होतो तेथे खादीचा झगा घातलेलेही एक धर्मोपदेशक पाहिले.

'भारतीयकरणाचा' पुरस्कार जे हिरीरीने करता आहेत त्या कार्डिनल पॅरॅकट्टिल याची प्रस्तावना असलेली व प्रा. उर्मीस यांनी शब्दबद्ध केलेल्या 'गिरीगीते'ची तिसऱ्या आवृत्तीतील एक प्रत नुकतीच पाहण्यात आली. अतिशय सुबक छपाई, लहान भगवद्गीतेच्या आकाराएवढीच, इंग्रजी व संस्कृत असे अशा ११८ श्लोकाची ही 'गिरीगीता' म्हणजे 'Sermon on the Mount Bible New Testament'चे संस्कृतमधील भाषांतर !

'गिरिगीते'ची सुरुवात होते आहे–

निस्तुलं क्रिस्तुदेवस्य सुविशेषामृतं पिगन्
चचाल जनसंघातो गलीलाम्बुधिवत्तदा ॥ १ ॥

(Having drunk the nectar of Chirst's gospel, the multitude was very much moved and thrilled, as the waves of the Sea of Galilee.)

याच गिरिगीतेचा शेवटचा म्हणजे ११८ वा श्लोक आहे–

यदीयं गिरिगीता संपठ्यते पाठ्यते नृणाम् ।
ऐहिकामुष्मिकं श्रेयः सुप्रापं नहि संशयः ॥११॥

(If this Sermon on the mount (गिरिगीता) is studied

and taught, well the, worldly as well as heavenly 'bliss' will be attained easily.)

'भारतीयकरणा'चे वेगवेगळ्या माध्यमातून कसे कसे प्रयत्न चालले आहेत, याविषयी वर काही उल्लेख केले आहेतच. वरवर विचार करीत असता हे प्रयत्न स्वागतार्ह वाटण्यासारखेच आहेत. पण जरा खोलवर विचार करता या 'भारतीयकरणा'मागे काही-तरी दूरस्थ हेतू आहे, असे म्हणायला जागा आहे. मागे उल्लेख केलेल्या पुस्तिकेतच भारतीयकरणाची भूमिका विशद करताना एका लेखात लिहिले आहे–

'...We must indicate here what we shall develop later. Indianisation of liturgy does not consist in mere borrowing of symbols and rituals from other religions, but they have to be assumed into a christian context and take on essentially christian meaning.' याच मुद्द्यावर भर देऊन लेखकाने (आर. एन्. प्रभु) जो सारांश म्हणून परिच्छेद दिला आहे त्यात म्हटले आहे–

'...Non-christian traditions should be integrated into the christian economy of salvation and should express the mystery of salvation...'

म्हणजेच 'भारतीयकरण' याचा अर्थ ज्या ज्या सोयीच्या गोष्टी-उपचार आहेत त्याचा बिनदिक्कत स्वीकार करून छुपेपणे या पांघरुणांच्या–बुरख्यांच्या आड दडून धर्मप्रसाराचे काम चालू ठेवणे! कारण याच पुस्तिकेत हेही स्पष्टच लिहिले आहे की, इतके दिवस प्रयत्न करूनही या भूमीत ख्रिश्चन विचार रुजलेला नाही, लोकांना तो दूरचा वाटतो. हे अंतर कमी करण्यासाठी जनसामान्यांना रुचेल, आवडेल अशी माध्यमे निवडून त्यावाटे 'येशू ख्रिस्त हाच एकमेव तारणहार आहे' हा संदेश दिला पाहिजे. मग ते कसे करायचे? भगव्या वस्त्राला–संन्याशांच्या वेषाला या देशात आदराचे स्थान आहे, मग धर्मप्रचारकांनी भगवा झगा घालणे हे भारतीयकरण! श्लोक–स्तोत्रे–प्रार्थना संस्कृतमधून करून त्या गायच्या, याचेही नाव भारतीकरण! येनकेन प्रकारेण जनमाणसाला भुरळ घालून त्यांना येशूच्या कळपात समाविष्ट केले पाहिजे, त्यासाठीची नवीन एक क्लृप्ती ही भारतीयकरणाची.

भारतीयकरणाचा खरा उद्देश अनेकांचे धर्मांतर करणे हाच दिसतो. आश्चर्याची व गंमतीची गोष्ट अशी की, ज्यांनी वर उल्लेखलेली पुस्तिका लिहिली त्यानाही मनातून हा उद्देश मान्य आहे. कारण ते लिहितातच–

'There are those... they will naturally feel that this is a stunt, a trick by which we wish to trap them into conversion. This objection is, no doubt, a serious one. ...Church will not have her true identity in India unless she is thoroughly indianised, ...Once they see that what is primary in the Church is not an institution– a foreign institution, but a community in every way native to our land, they will not consider us aliens or have the grounds for the resentment they have now...'

भारतीयकरणाचा हिरिरीने पुरस्कार करणारे हेच ख्रिश्चन धर्मोपदेशक एखादा प्रश्न–वादविवाद निर्माण होतो तेव्हा कसे वागतात? उदाहरणच घ्यायचे झाल्यास– स्वामी विवेकानंद म्हणजे या शतकातील भारतीय–हिंदु आकाक्षांना स.तासमुद्रांपलिकडे अमेरिकेत नेऊन विजयी करणारे असे व्यक्तिमत्व, सर्व भारतीयाचे मन अजूनही त्यांच्याविषयी प्रचंड आदर–अभिमान बाळगून आहे याच स्वामीजीची स्मृती कन्याकुमारी येथे शिलास्मारकाच्या रूपाने जागती राहावी या भारतभरच्या आवाहनाला विरोध कोणी केला तर भारतीयकरणाचा उदोउदो करणाऱ्या याच धर्मोपदेशकानी व त्याच्या धूर्त कारवायाना बळी पडून ख्रिश्चन झालेल्या आमच्या कोळी बाधवांनी. भव्य शिलास्मारक झाल्यानंतरही आजतागायत हा विरोध चालू आहे.

नुकत्याच केरळात उद्भवलेल्या निलक्कल प्रश्नाची पार्श्वभूमी तपासली तर याच ख्रिश्चन धर्मगुरुच्या कोत्या व संकुचित मनोवृत्तीवर ढळढळीतपणे प्रकाश पडेल. जेथे खरोखरच सेंट थॉमस आला होता का नाही, इथपासूनच शंका अनेक तज्ज्ञ घेतात, त्या किरकोळ जागेमध्ये क्रॉस सापडणे, तेथे रातोरात चर्च उभारले जाणे व पुनीत हृदयाच्या लोकांची प्रार्थना करण्यास रीघ लागणे या घटना पुरेशा बोलक्या आहेत.

एकीकडे हिंदुंमधील पूजापद्धतीचा अवलंब करायचा आणि दुसरीकडे येशूदास हिंदू दैवत अैय्यप्पास्वामीची भजने गात दरवर्षी शबरीमलयला जातो, म्हणून त्याला चर्चमध्ये येण्यास प्रतिबंध करायचा, हेही उदाहरण भारतीयकरणाची कल्पना कशी बेगडी आहे, हे स्पष्ट दाखवून देते.

## खरे 'भारतीयकरण'

त्रिवेंद्रम् येथे कामाच्या निमित्ताने वेगवेगळ्या शाळा, संस्था बघण्यात आल्या. रामकृष्ण आश्रम, सत्यसाईसेवासंघ अशा किमान पाच तरी हिंदु संस्थामध्ये श्रीराम, कृष्ण, महागणपती याच्या प्रतिमाबरोबर येशू ख्रिस्ताच्या प्रतिमा पाहण्यात आल्या, त्याची पूजा होते. पण भेट दिलेल्या एकाही ख्रिश्चन शाळेत येशू ख्रिस्ताशिवाय अन्य एकाही हिंदू दैवताची प्रतिमा चुकूनसुद्धा दृष्टीस पडली नाही. हे कसले भारतीयकरण? सध्या चालू आहे ते भारतीयकरण म्हणजे नुसते बाह्य उपचार, वेष, भाषा, आचारपद्धती याचे अनुकरण आहे, पण भारतीय विचाराचा जो आत्मा– 'सत्य एक आहे, त्याकडे जाण्याचे मार्ग अनेकानेक असू शकतात'– हे ख्रिश्चन धर्मोपदेशकांना मान्य आहे का? सत्याकडे जाण्याचा श्रीकृष्णाची पूजा हा जसा एक मार्ग आहे तसे येशूचे स्तवन हाही आणखी एक मार्ग आहे. 'येशू ख्रिस्त हाच एकमेव त्राता' ही भूमिका सोडून वर लिहिलेली भूमिका जर ख्रिश्चनांना मान्य असेल तर ती स्वागतार्ह आहे. दुर्दैवाने आज तसे ते दिसत नाही. येशूचे गौरवगान गात असताना या भूमीचे मानबिंदू श्रीराम, श्रीकृष्ण, वेद-उपनिषदे, दयानद–विवेकानद याच्याबद्दल क्वचितच, अगदी अभावानेच या मंडळीच्या तोंडून प्रकटपणे ऐकायला मिळते. त्यामुळेच 'भारतीयकरणा'चा हा जो नवा विचारप्रवाह येतो आहे त्याच्या मूळ हेतूबद्दलच शका घ्यायला जागा उरते– एका विचारवंताने व्यक्त केल्याप्रमाणे–

'चर्चचे भारतीयकरण व भारताचे ख्रिश्चनीकरण' असा प्रधान हेतू यामागे आहे का? □

(सुप्रसिद्ध अमेरिकी मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस यांच्या The Essence of sexual Morality या लेखाचा स्वैर अनुवाद)

# कामप्रेरणा आणि सामाजिक नीती

अनुवादक : कि. मो. फडके, एम. ए., डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

माणूस आपल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी जे वर्तन करतो त्या वर्तनाचा नैतिक दृष्टिकोणातून विचार करण्यापूर्वी सामान्यत: कोणत्याही बाबतीत नैतिक आचरण म्हणजे काय या व्यापक प्रश्नासबंधी कोणती तरी ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे. कारण माणूस आपल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी जे काही वर्तन करतो त्याला नैतिक म्हणावे, की अनैतिक म्हणावे हे आपण सामाजिक नीतीसबधी जी व्यापक भूमिका स्वीकारतो त्यावरच अवलंबून राहील म्हणून कोणत्याही वर्तनाच्या नैतिकतेविषयीची माझी भूमिका मी प्रथम स्पष्ट करणे इष्ट होईल.

नैतिक आचरणासबधीची माझी भूमिका काहीशी पाखडी आहे. कारण माझ्या मते नीतीचा पहिला नियम म्हणजे तुम्ही स्वत.शी प्रामाणिक रहावे; किंवा हाच नियम वेगळ्या शब्दात सागावयाचा म्हणजे तुम्ही मुख्यत. स्वत शी सहृदयतेने व प्रेमाने वागावे. अर्थात माझे असे ठाम मत आहे की, या पहिल्या नीतिनियमानुसार वर्तन करताना तुम्ही नीतीच्या दुसऱ्या नियमाचेही अगदी काटेकोरपणे व कसोशीने पालन करणे आवश्यक आहे आणि नीतीचा तो दुसरा नियम म्हणजे ज्यामुळे इतराना अकारण व निश्चितपणे अपाय होईल असे वर्तन तुम्ही हेतुपुरस्सरपणे करू नये किंवा असे म्हणता येईल की, वस्तुत. नीतीचा हा दुसरा नियम म्हणजे काट या सुप्रसिद्ध तत्ववेत्त्याने प्रतिपादलेले नीतितत्त्वच आहे काट म्हणत असे की, जे वर्तन समाजातील सर्व व्यक्तीनी आचरणात आणलेले तुम्हाला रुचणार नाही असे कोणतेही वर्तन तुम्ही स्वत: करू नका; परंतु मला ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, नैतिक वर्तनासबधीच्या माझ्या भूमिकेनुसार नीतीचा हा काटप्रणित नियम म्हणजे मी वरती सागितलेल्या नीतीच्या पहिल्या नियमाचा उपसिद्धात आहे आणि माझ्या मते नीतीचा पहिला नियम म्हणजे तुम्ही स्वत:शी प्रामाणिक रहावे. तुम्ही मुख्यत: स्वत:शी सहृदयतेने व प्रेमाने वागावे.

. प्रथम तुम्ही स्वत:शी प्रामाणिक रहावे व स्वत:शी सहृदयतेने वागावे असे मला का बरे वाटते? कारण तुम्ही इतर लोकांशी सदैव सहृदयतेने आणि त्यांना अकारण अपाय होणार नाही अशा प्रकारे वागण्याची पराकाष्ठा करावी. याला माझ्या मते एकच कारण आहे. ते म्हणजे तुमच्या अशा वागण्यामुळे इतर लोकही बहुधा माफक प्रमाणात तरी सहृदयतेने वागतील व तुम्हाला अपाय करणार नाहीत अशी तजवीज करण्याची तुमची इच्छा असते. अर्थात काही माणसे तुम्हाला आवडतात किंवा तुमचे त्यांच्यावर प्रेम असते व त्याना सुखी करण्यात तुम्हाला खरा आनंद वाटतो म्हणून तुम्ही झीज सोसूनही त्याच्याशी चागल्या प्रकारे वागता; परंतु अशा काही माणसाशी तुम्ही स्वखुशीने वागता हा झाला अपवाद. तशा वर्तनाचा सामाजिक नीतिनियम म्हणून क्वचितच पुरस्कार करता येणार नाही. कारण इतर काही माणसे तुम्हाला आवडतात किंवा त्याचा सहवास तुम्हाला आनददायक वाटतो म्हणून तुम्ही त्यांच्याशी सहृदयतेने वागता यात मुख्यत्वेकरून सामाजिक नीतितत्त्वाचा फारसा प्रश्नच उद्‌भवत नाही. तुम्हाला प्रिय असलेल्या माणसाशी तुम्ही विशिष्ट प्रकारे वागता यासबधी इतकेच म्हणता येईल की, तो तुमच्या वैयक्तिक आवडीनिवडीचा प्रश्न आहे तुम्हाला एखादा माणूस आवडतो व म्हणून तुम्ही त्याच्याशी सहृदयतेने वागता यावरून फार तर असे म्हणता येईल की, तुम्ही खरोखर प्रेमळ आहात; परतु म्हणून तुम्ही नीतिमानही ठरत नाही किंवा अनीतिमानही ठरत नाही.

नीतिशास्त्राचा संबध येतो तो माणसाच्या सामाजिक वर्तनाशी. वैयक्तिक आवडीनिवडीशी नाही. सामान्यत: इतर माणसे आपल्याला व्यक्तिश: आवडत असली अथवा नसली तरी आपण त्याच्याशी योग्य रीतीने वागावे किंवा निदान त्याना अकारण अपाय होणार नाही याची खबरदारी घ्यावी हे इष्टच आहे. याचे मुख्य कारण म्हणज उलटपक्षी इतर माणसानीही आपल्याशी योग्य रीतीने वागावे अशी आपली इच्छा असते. आपल्या स्वत:च्या सद्‌वर्तनाने आपण असे जग निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो की, ज्या जगात राहणे आपल्याला सुरक्षित व हितावह ठरेल आणि आपण जर इतर माणसाशी अयोग्य रीतीने वागलो तर साहजिकच त्याच्याकडून आपल्याला उपद्रव होईल तो टाळण्याची आपली इच्छा असते. म्हणजे अखेर सामाजिक नीतिनियम जेव्हा समंजस विचारांवर आधारलेला असतो तेव्हा त्याच्या मुळाशी एक पुरातन तत्त्व अध्याहृत असते. ते तत्त्व म्हणजे इतर माणसानी आपल्याशी ज्या प्रकारे वागावे असे वाटते त्या प्रकारे आपण इतर माणसांशी वागण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे सामाजिक नीतीची उभारणी स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर झालेली नसून ती अतिशय समजस अशा स्वहितकारक तत्त्वावर झालेली असते.

तुम्हाला असे वाटेल की, अनेक धर्ममार्तंडाची, गूढवाद्यांची व समाजहितैषी विचारवंताची शिकवण विचारात घेऊन, मी वरती ज्याला सामाजिक नीतीचा दुसरा नियम म्हटले आहे त्यालाच पहिल्या नियमाचे स्थान देणे अधिक सयुक्तिक होणार नाही काय? प्रथम आपण इतर माणसाशी चागल्या प्रकारे वागून, प्रेमाने त्याच्या-

साठी स्वार्थत्याग करून उलटपक्षी ती माणसेही आपल्याशी कृतज्ञपणे, माणुसकीची आब राखून चांगल्या प्रकारे वागतील अशी तजवीज करणे अधिक इष्ट नाही काय? शिवाय, आपल्या अशा वर्तनाने जास्त चांगला व प्रेमळ समाज निर्माण होणार नाही काय? नाही! तसे होणार नाही. निदान आपण जोपर्यंत देवदूताच्या समाजात राहत नाही तोपर्यंत तरी खासच नाही! कारण देवदूत हेच प्राणी असे असू शकतील की, ज्यांच्यावर आपण प्रथम प्रेम केले व त्यांच्यासाठी आपण स्वत:च्या हिताचा त्याग केला तर तेसुद्धा न चुकता आपल्या सद्‌वर्तनाला व प्रेमाला सद्‌वर्तनाने व प्रेमाने प्रतिसाद देतील.

मानवी समाजात मात्र जर आपण प्रथम इतरांसाठी स्वहिताचा त्याग करून भावी काळात आपला स्वार्थत्याग फलद्रुप होईल अशी अपेक्षा ठेवली तर बहुधा काय होईल याचे हमखास भाकीत करता येईल. आपण ज्यांच्यासाठी स्वहिताचा त्याग केलेला असेल त्याच्यापैकी लोक आपल्यावर प्रेम करतील व आपल्यासाठी स्वार्थत्याग करतील. परंतु कित्येकजण आपल्याशी नक्कीच अशाप्रकारे वागणार नाहीत. उलट ज्या काही लोकांशी आपण अतिशय सहृदयतेने वर्तन केले असेल तेच लोक आपल्याशी वाईट वागतील, आपल्या पाठीत खंजीर खुपसतील आणि आपल्या चांगुलपणाचा अनेक दुष्टप्रकारे फायदा घेतील. कारण आपल्याला आवडो अथवा न आवडो, वस्तुस्थिती अशी असते की शब्दश: लक्षावधी माणसे मूर्ख, अज्ञानी व भावनिकदृष्ट्या असमतोल प्रवृत्तीची असतात आणि अशी माणसे कोणाशी गुण्यागोविंदाने व सदाचारास धरून वर्तन करणार नाहीत असे नि:शंकपणे म्हणता येईल.

जेव्हा स्वार्थत्याग हा सामाजिक नीतीचा पहिला नियम म्हणून प्रतिपादला जातो तेव्हा असे गृहित धरलेले असते की, ज्याच्यासाठी आपण स्वहिताचा त्याग करतो ते योग्य प्रसंग आला असता न चुकता आपल्यासाठी त्याच्या स्वहिताचा त्याग करतील. परंतु हे गृहीत-तत्त्व चूक आहे; कारण ते वस्तुस्थितीवर क्वचितच आधारलेले नाही. वस्तुत: आपण ज्याच्यासाठी स्वार्थत्याग करतो त्यांना आपल्या वर्तनामुळे परावलंबी व भावनिकदृष्ट्या रोगट होण्यास प्रोत्साहन मिळते. बहुतेक वेळा स्वार्थत्याग करणाऱ्या माणसाच्या असे लक्षात येते की तो 'बकरा' बनत आहे; आणि मग स्वत:च्या या दुबळेपणाबद्दल तो स्वत:चा द्वेष करतो, इतकेच नव्हे, तर अखेर तो ज्या माणसांची मर्जी संभाळण्यासाठी वेडपटपणे जिवाचा आटापीटा करीत असतो, त्यांचाही द्वेष करू लागतो.

साराश, नैतिकदृष्ट्या शहाणपणाचा नियम म्हणजे स्वत:शी प्रामाणिक राहणे! कारण फक्त याच मार्गाचा अवलंब करून या जगात निदान एक व्यक्ती तरी तुमच्या हिताचे रक्षण करीत आहे याची तुम्ही खात्री बाळगू शकता! त्याचप्रमाणे नीतीच्या या पहिल्या नियमाचा उपसिद्धांत म्हणून वरती सांगितलेल्या दुसऱ्या नीतीनियमाचाही तुम्ही काटेकोरपणे अवलंब करावयास हवा. तुम्ही या दुसऱ्या नीतीनियमाचे पालन केले नाहीत तर इतरांना अकारण अपाय केल्यामुळे त्यांच्या प्रतिहल्ल्यास तुम्हाला तोंड द्यावे लागेल आणि या दुसऱ्या नीतीनियमानुसार वर्तन केलेत तर त्यामुळे या स्पर्धाळू जगात तुम्हाला इतराकडून बहुधा कमीत कमी उपद्रव होईल याची थोडीशी तजवीज करता येईल थोडीशी म्हणण्याचे कारण असे की, वास्तववादी दृष्टिकोणातून विचार केला तर असे दिसून येईल की, अशी सपूर्ण तजवीज करणे मानवी उपायांच्या पलीकडे आहे!

## पूरक उपसिद्धांत

माणसाने प्रथम स्वत:शी प्रामाणिक राहून स्वत:शी सहृदयतेने व प्रेमाने वागावे या पहिल्या नीतीनियमाला पूरक असे इतरही काही उपसिद्धांत सांगता येतील. त्यांपैकी काही प्रमुख उपसिद्धांत पुढे दिले आहेत.

(१) सद्य:कालीन जगात अत्यावश्यक व सर्वांत अधिक स्पृहणीय उद्दिष्ट म्हणजे वैयक्तिक व सामाजिक सुख. यामध्ये चांगले आरोग्य, समाधान, निर्भय व निर्वैर मन आणि शक्य तितक्या स्त्री–पुरुषांचा खराखुरा वैयक्तिक संतोष इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

(२) वैयक्तिक व सामाजिक सुखप्राप्ती हे सर्वांत श्रेष्ठ उद्दिष्ट आहे याचा अर्थ असा की कर्तव्यनिष्ठा, धर्मनिष्ठा, अध्यात्मिक व इतर सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती, देशप्रेम, वंशप्रेम, फाशीवाद, विषयलोलुपता इत्यादी कित्येक गोष्टी मानवी सुखात भर घालीत असतील तर त्या महत्त्वाच्या ठरतात. अशा सर्व गोष्टी कोणत्यातरी गुप्त, गूढ व 'उच्च' पातळीवरून अंगभूतपणे श्रेष्ठ व श्रेयस्कर नसतात.

(३) खऱ्या अर्थाने मानवी समाजाचे सुखसमाधान याचा अर्थ समाजातील जास्तीत जास्त स्त्री–पुरुषाचे वैयक्तिक सुखसमाधान व कल्याण. मानवी समाजाचे सुखसमाधान म्हणजे काही कोणत्यातरी अमूर्त समाजाचे, राष्ट्राचे, शासनाचे, राज्याचे, मातृभूमीचे, शहराचे, पंथाचे, वंशाचे अथवा धर्माचे कल्याण नाही. कोणत्याही संस्थांचा अथवा मतप्रणालीचा इतिहास कितीही आदरणीय वा पूजनीय असला तरी त्याचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी करावयास हवा. त्या संस्था अथवा मतप्रणाली कोणत्यातरी गूढ कारणासाठी किंवा त्याचा सत्ताधारी गटाला उपयोग होत आहे म्हणून त्यांना चिरस्थायी करण्याचा प्रयत्न केला की त्याचे परिवर्तन अनिष्ट विकृतीत होते. आणि मग अशा संस्था किंवा मतप्रणाली अपरिहार्यपणे धोकादायक ठरतात.

(४) वास्तववादी दृष्टिकोणातून पाहता सुख म्हणजे माणसाने आजच्या व दृष्टिपथातील भविष्यकाळात मिळविण्याचे समाधान असते. किंवा असे म्हणता येईल की सुख म्हणजे या विश्वात सांप्रत मानवी जीवनात प्राप्त करून घेण्याचे समाधान; आणि या समाधानाचा काही विद्वानांनी प्रतिपादलेल्या तथाकथित परमोच्च आनंदाशी अथवा तशाच तऱ्हेच्या स्वर्गीय किंवा पारलौकिक संतोषाशी काहीही संबंध नाही. वास्तविक आपण ज्या सुखप्राप्तीची अपेक्षा करू शकतो ते सुख म्हणजे आज अस्तित्वात असणाऱ्या व भविष्यकाळात असू शकणाऱ्या मानवाचे सुख. असे सुख म्हणजे काही कोणत्यातरी संभाव्य अशरीरी आत्म्याचे, आत्म्याचे अथवा देवाचे सुख नव्हे.

(५) मानवी समाजाला सर्वाधिक सुखसमाधान प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी काय करावयास हवे? पहिली गोष्ट

म्हणजे समाजातील सर्व अविकृत व परिपक्व व्यक्तींना त्यांचा विचारप्रणालीचा अनिर्बंधपणे व सर्वतोपरीने प्रसार करण्याची मुभा दिली पाहिजे; इतकेच नव्हे तर तसे करण्यास त्याना प्रोत्साहन दिले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे अशा व्यक्तीना त्यांची कोणत्याही क्षेत्रातील निर्मिती समाजापुढे ठेवण्याची मुभा देऊन त्याना तसे करावयास प्रोत्साहन दिले पाहिजे आणि अशा व्यक्ती जोपर्यंत इतर अविकृत व परिपक्व व्यक्तीना अकारण, अन्याय्यपणे, अगातुकपणे व जाणूनबुजून अपाय करीत नाहीत किंवा प्रौढ वयात न आलेल्या अथवा अपरिपक्व व्यक्तींचा त्याना अपायकारक ठरेल अशाप्रकारे फायदा घेत नाहीत तोपर्यंत त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे.

जर एखादे वर्तन (मग ते कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी घडलेले असो वा इतर कोणत्याही बाबतीतील असो) परिपक्व व प्रौढ माणसाने इतर प्रौढ परिपक्व व्यक्तीबरोबरच्या संबधात केलेले असेल व जर त्यामुळे इतर कोणालाही अकारण, अन्याय्यपणे किंवा अगातुकपणे अपाय होत नसेल तर त्या वर्तनाला अनैतिक म्हणता येणार नाही असे माझे ठाम मत आहे; मग माणसानी निर्माण केलेले अनेक कायदे, धर्म किंवा इतर अधिकारी व्यक्ती काहीही म्हणोत !

सामाजिक नीतीबद्दलची माझी मते वरती थोडक्यात विशद केली आहेत. आता आणखी एक गोष्ट स्पष्ट करावयास हवी, ती अशी की जरी एखाद्या माणसाने वरील नीतिनियमाचे उल्लंघन करून उघडपणे अनैतिक वर्तन केले तरी त्याच्या अनिष्ट वर्तनाबद्दल त्याचा व्यक्ती म्हणून सपूर्ण धिक्कार करून त्याला शिक्षा करू नये. उलट त्याचा व्यक्ती म्हणून तिरस्कार न करता त्याचे वर्तन अनिष्ट होते ही गोष्ट त्याला वस्तुनिष्ठपणे पटवून द्यावी; आणि भविष्यकाळात त्याच्याकडून परत तसे अनिष्ट वर्तन केले जाणार नाही अशी काळजी घेण्यास त्याला मदत करावी. परंतु त्या माणसाला आपण सपूर्णतः पापी अथवा निंद्य आहोत असे वाटून देऊ नये. कारण त्याने केवळ अनैतिक वर्तन करून तो एक प्रमादशील मानव आहे असे दाखवून दिल्यामुळे त्याचा व्यक्ती म्हणून तिरस्कार करणे व त्याला कवडीमोल समजून त्याचे माणूस म्हणून अवमूल्यन करणे हेही त्याने केलेल्या चुकीच्या व अनैतिक वर्तनाइतकेच चुकीचे व अनैतिक वर्तन ठरते. या माझ्या मतावर माझा दृढ विश्वास आहे आणि ते मत मी माझ्या लेखनाद्वारे अनेकदा प्रतिपादलेले आहे.

वरील नीतीनियमांच्या भूमिकेवरून माणूस आपल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी जे वर्तन करतो त्या वर्तनाच्या नैतिकतेची मीमांसा सहज करता येते. म्हणून आता थोडक्यात वरील नीतिनियमांच्या आनुषंगाने आजच्या काही लैंगिक समस्यांचा विचार करू या.

(१) हस्तमैथुन : हस्तमैथुन करताना माणूस आपले स्वत.चेच जननेन्द्रिय उद्दीपित करीत असतो; तेव्हा या कृतीला सामाजिक कृती म्हणताच येत नाही. आणि अनैतिक वर्तन म्हणजे इतराना अपायकारक करणारे वर्तन अशी व्याख्या केली तर हस्तमैथुनाच्या कृतीत नैतिकतेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण हस्तमैथुनाच्या कृतीत इतरांचा अतर्भावच नसतो. हस्तमैथुन केल्यामुळे माणूस कदाचित स्वत.ला अपाय करून घेईल. अर्थात असे होण्याची शक्यताही फारच कमी असते. परतु तसे झाले तरीसुद्धा फार तर असे म्हणता येईल की, त्या माणसाचे वर्तन आत्मघातकी आहे. आणि तो माणूस भावनिकदृष्ट्या गंभीरपणे प्रक्षुब्ध झालेला असेल तर तो स्वतःच्या आत्मघातकी कृत्यास जबाबदार आहे असेही म्हणता येणार नाही. मग तो स्वतःच्या अनिष्ट वर्तनाबद्दल निंद्य किंवा दोषार्ह आहे असे म्हणणे तर दूरच राहो !

## विकृती । अनैतिकता । केव्हा ?

(२) प्रणयक्रीडा : तारुण्याच्या उबरठ्यावर उभ्या असलेल्या मुलामुलींनी अथवा प्रौढानी केलेले प्रणयक्रीडा अनैतिक तर नाहीच; पण ती क्वचितच अनिष्ट असते. कारण त्यामुळे बहुधा कधीच दुसऱ्याना अपाय होत नाही. परतु प्रणयक्रीडा म्हणजे इतराबरोबर केलेले वर्तन असल्यामुळे त्याबाबत सामाजिक नीतिनियमांचा प्रश्न जरूर उद्‌भवतो. आणि वरील नीतीनियमानुसार असे म्हणता येईल की, एखाद्या माणसाने दुसऱ्या व्यक्तीला प्रणयक्रीडेत सहभागी होण्याची सक्ती केली किंवा त्या व्यक्तीला कोणत्यातरी थापा मारून प्रणयक्रीडेस उद्युक्त केले तर ते वर्तन अनैतिक म्हणावे लागेल. तसेच एखाद्या माणसाने दुसऱ्या एखाद्या अल्पवयातील व्यक्तीचा प्रणयक्रीडेसाठी गैरफायदा घेतला तर तसे वर्तन अनैतिक म्हणावे लागेल. परतु आपल्या समाजात सामान्यतः माणसे ज्या रीतीने प्रणयक्रीडेचा आनंद उपभोगतात त्यात क्वचितच काही अनैतिक असते.

(३) विवाहपूर्व समागम : आपण काय करीत आहोत हे समजण्याइतक्या परिपक्व व्यक्ती विवाहापूर्वी समागमास स्वखुशीने तयार असतील तर त्यामुळे कोणाला काहीच अपाय होणार नाही. अर्थात अशा व्यक्तीनी आपण कायद्याच्या किंवा तत्सम इतर कचाट्यात सापडणार नाही याची सूज्ञपणे काळजी घेतली पाहिजे. आणि जोपर्यंत एखादा माणूस आपल्या जोडीदाराला फसवत नाही, त्यांना गरोदर राहण्यास अथवा गुप्तरोग होण्यास जाणूनबुजून कारणीभूत होत नाही किंवा त्यांच्यावर बळजबरी करीत नाही तोपर्यन्त त्याचे वर्तन अनैतिक आहे असे म्हणता येणार नाही अर्थात अशा माणसाबरोबर स्वखुशीने विवाहपूर्व समागमास तयार झालेली व्यक्ती स्वतःचे निर्णय घेण्यास स्वतत्र व समर्थ आहे असे गृहीत धरले आहे. परंतु विवाहापूर्वी समागमास तयार झालो याबद्दल पश्चात्ताप वाटणे शक्य आहे परतु अशा वेळी तिच्या प्रियकराने त्याच्या प्रेयसीचा एक स्वतत्र व्यक्ती म्हणून चुकीचा निर्णय घेण्याचा, अयोग्य वर्तन करण्याचा व बहुधा अशा अनुभवावरून स्वतःबद्दल व इतराबद्दल अधिक शहाणपणा शिकण्याचा अधिकार पूर्णपणे मान्य करावयास हवा. कारण चूक करणे हा तर माणसाचा जन्मसिद्ध अधिकारच आहे.

(४) व्यभिचार : कित्येकदा व्यभिचार हे अनैतिक कृत्य असते. विशेषतः व्यभिचार करणारी व्यक्ती जर विवाहित असेल तर बहुधा तिचे वर्तन अनैतिक असणे शक्य असते. कारण सामान्यतः आपल्या समाजात वैवाहिक सबंधात परस्परावरील विश्वास गृहीत धरलेला असतो आणि विवाहित व्यक्ती जेव्हा व्यभिचार करते तेव्हा तिच्या वर्तनामुळे विवाहबंधनात उघडपणे समाविष्ट असलेल्या अथवा गृहीत धरल्या गेलेल्या कराराचा भंग होतो. अर्थात एखादा विवाहित पुरुष व्यभिचार करीत आहे हे त्याच्या पत्नीला माहीत असेल व तिची त्याला संमती असेल तर मग ती वेगळीच गोष्ट झाली ! शिवाय, जर अविवाहित माणसाचा त्याच्याबरोबर व्यभि-


चार करावयास तयार झालेल्या व्यक्तीच्या वैवाहिक जोडीदाराशी कसलाही संबंध नसेल तर त्या माणसाचे तथाकथित व्यभिचारी वर्तन नीति-नियमांचे उल्लंघन करते, असे म्हणण्यास काहीच कारण नाही.


५) विकृत लैंगिक वर्तन : माणसाने आपल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी केलेल्या कोणत्या वर्तनाला विकृत लैंगिक वर्तन असे म्हणता येईल ? जर एखादा माणूस आपल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी निर्बुद्धपणे एखाद्या विशिष्ट लैंगिक कृतीला झपाटल्याप्रमाणे व घट्टपणे चिकटून राहील आणि भयाकुल होऊन आपल्या कामप्रेरणेची पूर्ती करणाऱ्या इतर सर्व लैंगिक कृत्यांचा त्याग करीत असेल तर त्याचे वर्तन विकृत आहे, असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, आपले शरीरावयव दुसऱ्याला उघडे करून दाखविण्याचे वेड किंवा फक्त समलिंगी समागमाचाच आश्रय घेणे यांना विकृती म्हणता येईल आणि आजच्या जमान्यात कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी समागमाविरहित ज्या अनेक प्रणयक्रीडांचा अवलंब करण्यात येतो त्यांना विकृत वर्तन म्हणता येणार नाही, मग त्या प्रणयक्रीडा समागमापूर्वीची प्राथमिक पूर्वतयारी म्हणून केलेल्या असोत किंवा समागमाला पर्याय म्हणून केलेल्या असोत. वरती म्हटल्याप्रमाणे खरोखरच ज्याला विकृत लैंगिक वर्तन म्हणता येईल असे वर्तन करणारी माणसे भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध झालेली व आत्मघातकीपणे मागणारी असतात; परंतु त्यांच्या विकृत लैंगिक कृत्यात दुसरी प्रौढ व्यक्ती स्वखुशीने भाग घेत असेल तर त्यांच्या कृत्यांना अनैतिक म्हणता येणार नाही.




६) बलात्कार : सर्व तऱ्हेच्या बलात्कारांना अनैतिक वर्तन म्हणावयास हवे, कारण त्यात सक्ती व जुलूम यांचा अंतर्भाव असतो. एखादी गोष्ट करावयास दुसऱ्या व्यक्तीची अनुमती नसताना तिला बळजबरीने ती गोष्ट करावयास लावून तिला अपाय करणे म्हणजे उघडउघड अनैतिक वर्तन करणे होय आणि ज्याप्रमाणे एखाद्या माणसाने अकारण इतरांवर हल्ला केला तर त्याला यथोचित शासन करावयास हवे त्याचप्रमाणे एखाद्या माणसाने बलात्कारासारखे अनैतिक वर्तन केले तर त्यालाही न्याय्यपणे व निःपक्षपातीपणे यथोचित शासन करावयास हवे; परंतु बलात्कार हे केवळ अनैतिक लगिक कृत्य आहे म्हणून त्या कृत्याचा कोणत्या तरी खास वेगळ्या गटात समावेश करू नये. उदाहरणार्थ, अनैतिक वर्तनाचे पुढील दोन नमुने पाहा. एक माणूस स्त्रीवर बलात्कार करतो; परंतु तिला म्हणण्यासारखा अपाय असा काहीच करीत नाही. दुसरा माणूस आपल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी नाही तर इतर काही कारणाने स्त्रीवर अकारण हल्ला करून तिला शारीरिकदृष्ट्या जन्माची पंगू करून ठेवतो. वस्तुतः या दोन्ही अनैतिक वर्तनांना कायदेशीरपणे समान शासन व्हावयास हवे व त्यांच्यावर मानसोपचारही करावयास हवा. परंतु लैंगिक गुन्हेगारीबद्दल पहिल्या माणसाला त्याच्या मूर्ख व अनिष्ट, अनैतिक वर्तनाबद्दल आज–काल कधीकधी केली जाते तशी खास क्रूर शिक्षा करता कामा नये.

एकूण सामाजिक वर्तन व लैंगिक वर्तन यांच्यासंबंधीच्या नीति-नियमांविषयीची माझी भूमिका ही अशी आहे. सारांशाने सांगावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, जर एखादा माणूस दुसऱ्याला निश्चितपणे, अगांतुकपणे, अकारण व अन्यायाने अपाय करीत असेल किंवा एखाद्या अपरिपक्व व वयात न आलेल्या व्यक्ती घातक ठरेल अशाप्रकारे तिचा गैरफायदा घेत असेल तर तो माणूस अनैतिक वर्तन करीत आहे असे म्हणता येईल. यापेक्षा दुसऱ्या कोणत्याही प्रकारे एखादे वर्तन सामाजिकदृष्ट्या खरोखर अनैतिक कसे ठरू शकेल याची मला कल्पनाच करता येत नाही. वरती सांगितल्याप्रमाणे केलेले कोणतेही वर्तन ज्या कारणांसाठी अनैतिक ठरते त्याच कारणांसाठी माणसाने कापल्या कामप्रेरणेच्या पूर्तीसाठी केलेले एखादे वर्तन अनैतिक ठरते. परंतु तसे वर्तन केवळ कामप्रेरणेच्या संदर्भात केलेले असते म्हणून ते अनैतिक ठरत नाही. जेव्हा एखादा माणूस काही अनैतिक व अनिष्ट वर्तन करतो तेव्हा त्याचे वर्तन जरूर निंद्य समजावे; परंतु तोही एक प्रमादशील माणूस असतो आणि म्हणून त्याला व्यक्ती म्हणून संपूर्णपणे नीच किंवा निंद्य लेखू नये. कारण तो माणूस स्वतःला पूर्णतः नालायक समजून स्वतःला कडक शिक्षा न करील तरच बरे. त्यामुळे निदान भविष्यकाळात आपल्य हातून घडणाऱ्या चुका कशा कमी करता येतील यावर त्याला लक्ष केंद्रित करता येईल आणि अशाप्रकारे तो अधिक दक्ष राहील तर भविष्यकाळात त्याच्या हातून कमी प्रमाद घडतील, असे जरूर म्हणत येईल. □







विनायक राजगुरु

# ओढावी

गाडीने नेरळ स्टेशन पाठीमागे टाकले होते. ती हळूहळू वळणे घेत घाट चढत होती. एका वळणाचे दृष्य गणपतीला फार लोभस वाटत असे. दूर डोंगराच्या बेचक्यात तीन-चार झोपड्या एकमेकांना चिकटून बसलेल्या होत्या. त्या झोपड्यांतून एक पायवाट कोठेतरी जात होती. बाकी सगळीकडे उंच पळसाचे वृक्ष पसरले होते. ह्या ठिकाणी गाडी पोचेपर्यंत सूर्य क्षितिजापलीकडे गेलेला असे. सगळा देखावा धूसर होत असे. फक्त झाडांचे शेंडे आणि ढगांच्या किनारी झळकत असत. क्षणभर दिसणारे हे दृश्य गणू पोट भरून पहात असे. मुंबई–पुणे प्रवासातील तो काळ एक आगळा आनंद देऊन जात असे. कित्येक वर्षे या देखाव्याची अवीट गोडी त्याने चाखली होती. उद्यापासून मात्र तो या आनंदाला पारखा होणार होता.

किती तरी वर्षें झाली मुंबईची नोकरी करून. तीस वर्षांपूर्वी प्रथम तो पुण्याहून मुंबईला गेला, तेव्हा त्याला वाटलं, फार दिवस हा प्रवास आपल्याला करावा लागणार नाही. वर्षभरात गिरगावात एखादी खोली मिळेल, पण तसे झाले नाही. एका हॉटेलातील एक खाट यापलीकडे त्याची मजल गेली नाही. लग्न झाल्यावर पहिली काही वर्षे त्याने खूप खटपट केली; पण यश आले नाही. पाहाता पाहाता गोटचा दहा वर्षांचा झाला आणि रेखा चार. त्यानंतर त्याने जागा शोधण्याचा प्रयत्न सोडून दिला. सकाळ संध्याकाळ डेक्कन क्वीन हा त्याच्या



जीवनाचा कायमचा आधार झाला. दहा वर्षांच्या नोकरीनंतर तो मॅनेजर झाला. पटेल आणि मर्चंट कं.च्या नोकरांची संख्या बारावरून दोनशेवर गेली. ऑफीस गिरगावातून नरीमन पॉइंटवर गेले; परंतु गणपतीची डेक्कन क्वीन सुटली नाही. त्याला आज तीस वर्षे झाली. गणपतीच्या हिशेबी मनाने गणित केले. म्हणजे आपण १५०० आठवडे प्रवास केला. रजेचे आणि सुट्टीचे दिवस वजा जाता आपण ९१०० दिवस म्हणजे १८,२०० वेळा पुणे–मुंबई प्रवास केला. आणखी आकडे त्याच्या डोक्यात फिरत होते; पण लोणावळा स्टेशनमध्ये गाडी शिरली. त्या स्टेशनवरच्या गडबडीने त्याच्या विचाराचा काम्प्युटर बंद झाला.

आज अशा प्रवासाचा शेवटचा दिवस होता. उद्यापासून पुणे–मुंबई प्रवास बंद. स्टेशनवर 'लोणावळा–चिक्की' असे ओरडणाऱ्या पोऱ्याकडे त्याचे लक्ष गेले. त्याला बोलावून गणूने दोन पाकिटे चिक्की घेतली. रॅकवरील हँड-बॅग काढून त्यात चिक्कीची पाकिटे ठेवली. बॅग परत रॅकवर ठेवून खाली बसताना त्याचा धक्का धोक्याच्या साखळीला लागला. त्याचा खण्खण् आवाज एकून गणूने वरच्या अंगाला नजर टाकली. हजार वेळा त्यानी ती साखळी पाहिली असेल. त्याच्या खालची नोटीसही त्याची पाठ झाली होती. 'ओढावी– गाडी थांबविण्यासाठी साखळी ओढावी. गैरवापर केल्यास २५० रु. दंड आणि अथवा सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा. खरं म्हणजे शिक्षेपेक्षा 'ओढावी'

या शब्दाची गणपतीला जास्त भीती बसली होती. त्याच्या मनात विचार आला, निदान 'ओढावी' शब्दाची भीती जाण्याकरता म्हणून तरी एकदा ओढावी साखळी. फार तर काय, दंड होईल. आयुष्यभर सगळ्याची भीती बाळगून आपण जगलो–काय मिळवलं आपण ? त्यापेक्षा बडा जास्त यशवत झाला. कशाचेच भय नव्हतं त्याला. आयुष्यभर काय पाहिजे ते धंदे केले– झाली का त्याला शिक्षा ?

बडाकडे बंगला, गाडी, सुरेख बायको सगळं काही होतं. कोणी म्हणे बंडाने मुंबईला बाई ठेवली होती; पण होती का कोणाची बंडापुढे ब्र काढण्याची ताकद ? आपण मात्र काहीच मिळवू शकलो नाही. एक दिवस ऑफिस बुडवलं नाही, की घरच जेवण चुकवलं नाही. दुसऱ्याच्या काय, पण स्वतःच्या बायकोकडेही डोळे वर करून पाहिलं नाही. काय मिळवल आपण ?

बडाने स्कूटरचा काळाबाजार केला. प्लॉटचा बाजार केला. साखरेचा काळा पैसा केला. ज्या ज्या गोष्टीत बेकायदा पैसे होते, त्या सगळ्या बडाने केल्या. त्याला खूप पैसा मिळाला. आपली बायको कमल म्हणते ते काही खोटं नाही. 'तुमच्यात धमक नाही. उगीच मारता चांगुलपणाच्या गप्पा. तुमचा चांगुलपणा ही भ्याडपणा झाकायची शाल आहे.' आपण भ्याड नाही. आता तरी हे सिद्ध करून दाखवले पाहिजे. ही साखळी ओढावी आणि भरावा दड. घरी जाऊन कमलला सागावं, 'हे बघ मी काय केल, आता बोल, आहे का मी भ्याड ?' पण साखळी ओढण्याच्या नुसत्या कल्पनेने गणूला घाम फुटला.

'ओढावी' या शब्दाशी त्याच्या काही विचित्र आठवणी गुतल्या होत्या. त्या वेळी बंडा आणि तो असतील दहा–बारा वर्षांचे. पुण्यात लोखंडे तालमीजवळ भटांच्या वाड्यात ते रहात होते. खालच्या मजल्या-वर गणूचे बिऱ्हाड होते. वरच्या मजल्यावर बंडाचे बिऱ्हाड होते. तिसऱ्या मजल्यावर माळा होता. वाड्यात आणखीही चार बिऱ्हाडे होती. समोरच्या बाजूला एक मोठा चौक होता. माळा मालकांकडे होता.

एक दिवस दुपारी बंडा आला आणि म्हणाला, 'चल आपण सिगारेट पिऊ या !' त्याने वडिलांचे खिशातून एक पिवळा हत्तीचे पाकीट व काड्याची पेटी पळवून आणली होती. गणू घाबरला व नको, नको म्हणू लागला; पण बडाने त्याला धीर दिला. दोघेही वरच्या माळ्यावर गेले. एका कोपऱ्यात सिगारेट ओढण्यासाठी बसले. त्यांना सिगारेट पेटवायला जमेना. काडी ओढून सिगारेट जवळ आणेपर्यंत ती विझून जाई. अर्धवट जळलेल्या काड्या ते पाठीमागे फेकून देत होते. पाठीमागे कोपऱ्यात माल-कीणबाईंचा रॉकेलचा डबा असे. एक काडी त्या डब्यात पडून डबा भडकला. डब्याला लागलेली आग पाहून बडा आणि गणू घाबरले आणि 'आग, आग' असे ओरडत बाहेर आले.

नशिबाने आग विझविण्यात सगळ्यांना लौकरच यश आले. बंडाचे वडील समंजस होते, त्यामुळे त्याचे थोडक्यात भागले; पण गणूला असा मार बसला की, तो आठ दिवस अथरूण धरून होता ! त्या वेळेपासून कोणी सिगारेट ओढण्याची गोष्ट काढली की, गणूला कापरं भरत असे.

चांगल्या वागणुकीचे धडे देण्यासाठी गणूचे वडील मारपीट करीत असत. समजा-वून सागण्यापेक्षा थोबाडीत दिली तर लौकर डोक्यात शिरतं, अशी त्यांची भावना होती. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे विचार गणूच्या डोक्यात दररोज ठोकून बसविले जात होते. गरिबीत दिवस काढावे लागले तरी चालतील; पण पापाचा पैसा नको, अशा भावनेने गणूने तीस वर्षे प्रामा-णिकपणे नोकरी केली. हाताखालच्या लोकानी हजारो रुपये खाल्ल्याची प्रकरणे त्याने उघडकीला आणली होती; पण या सगळ्याचे फळ काय मिळाले ? गणूच्या निवृत्तीच्या कार्यक्रमाला सर्व ऑफीस हजर होते. सर्व सेवकांनी मिळून तीन हजार रुपयाची थैली दिली ! ऑफीसकडून त्याला एचएमटी घड्याळ मिळाले.

आता उद्यापासून काय ? ऑफिसकडून त्याला प्रॉव्हिडट फंड, ग्रॅच्युइटी म्हणून पैसे मिळणार होते; पण त्यावर त्याने दोन वेळा कर्ज काढली होती. रेखाच्या लग्नात पंचवीस हजाराचे, पंधरा हजार रुपये गोटयानं बिऱ्हाड केले तेव्हा. अशी ती दोन कर्जं होती. दर वर्षाला व्याजाची रक्कम मुदलात जमा होत गेली. व्याजसुद्धा गणू परत फेडू शकला नाही. शेवटी प्रॉव्हिडंड फंड व ग्रॅच्युइटी कंपनीच्या हवाली करून गणू नोकरीतून निवृत्त झाला ! दोन महि-न्याचा पगार आणि तीन हजार रुपये रोख घेऊन तो परत पुण्याला जात होता. गणूने खिडकीतून बाहेर पाहिलं, गाडी तळेगाव स्टेशनमधून वेगाने जात होती.

उजव्या बाजूला धोक्याची साखळी गाडीच्या बाजूवर आपटून खण् खण् आवाज करीत होती. परत त्याचं लक्ष साखळी-खालच्या 'ओढावी' अक्षराकडे गेले. त्याचं अग क्षणभर भीतीनं थरारलं. ती एक मनाला यातना देणारी आठवण होती. गणू बी. ए.च्या शेवटच्या वर्षाला होता. परीक्षा दोन महिन्यावर आलेली होती. वाड्या-तल्या मधल्या चौकातल्या ओसरीवर टेबल-खुर्ची टाकून गणू रोज सकाळी अभ्यास करत असे. वाड्यातले इतर विद्यार्थीही त्याच ओसरीवर अभ्यास करीत असत. साऱ्याची सुलू त्या वर्षी मॅट्रिकला होती. तीही सकाळी उठून अभ्यास करीत असे. सुलू सावळी होती रुपाने होती चारचौघी-सारखी; पण लाजे मोठी गोड ! तिचे काळे टपोरे डोळे काळजाचा वेध घेत असत. तिच्या लांबसडक केसांचा रंग गर्द निळा होता. चालताना ती मानेला असे हेलकावे देई की. तिची लाब वेणी एका बाजूने दुसऱ्या बाजूला हेलकावे घेत असे. एकदा वाड्यात खेळताना बंड्याने तिची वेणी ओढली होती. सुलूने कुरकुर केली; पण कोणाकडे चहाडी केली नाही. गणूलाही तिची वेणी ओढावी,अशी इच्छा निर्माण होत असे; परंतु त्याचे धाडस होत नसे.

एक दिवस सकाळी साडेपाच–सहा वाज-ताची गोष्ट. परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांच्या घोकंपट्टीचे आवाज सगळ्या वाड्याभर ऐकू येत होते. कोणाच्या घरा-तून स्टोव्ह पेटल्याचा फर्फर् आवाज ऐकू येत होता. वाड्याला हळूहळू जाग येत होती. ओसरीवर मुलांचा अभ्यास चालू होता. सुलू हुषार होती पण तिला जॉमेट्री विषय समजत नसे. एक डिफिकल्टी घेऊन ती गणूला विचारायला गेली. टेबलावर पुस्तक ठेऊन वाकडी मान करून ती गणूशी बोलत होती. तिची लाब वेणी उजव्या खांद्यावरून

टेबलावर पसरली होती. क्षणभर गणूचे भान हरपले आपला उजवा हात त्यानं तिच्या वेणीवरून फिरवला. त्याच्या सर्वांगाला गोड झिणझिण्या आल्या. स्वर्गसुख ते आणखी वेगळं काय असणार, असा विचार त्याच्या मनात येऊन गेला. काय घडले ते कळायच्या आत सुलू घरात पळून गेली. पाठीवर पडणाऱ्या बुक्क्यानी तो शुद्धीवर आला. त्याने मागे पाहिले तो त्याचे जन्मदाते उभे होते. त्यांनी हाता–तोडाने हल्ला चढवला, 'हा तुमचा अभ्यास !' ते कडाडले, 'चागले पांग फेडाल आमचे. तुम्हाला जन्म दिला त्याची ही शिक्षा. बायकोच्या बाळतपणाचा खर्च अजून फिटला नाही, तोच सुनेचे देणे आमच्या उरावर टाकायचा तुमचा बेत दिसतो नोकरी करून घराला हातभार लावायचा राहीला बाजूला. उलट तुमचे हे धदे!' आई मधे पडली नसती तर काही धडगत नव्हती त्या दिवशी. सारा वाडा हा तमाशा पहात होता. पुष्कळ वर्षे झाली त्या घटनेला. 'ओढावी' शब्दामुळे आज त्याला सारं पुन्हा आठवलं

कुठल्याशा छोटचा स्टेशनमधून जाताना गाडी खाड् खाड् आवाज करीत होती. त्यामुळे गणू तंद्रीतून जागा झाला. त्यानं विचार केला, 'बस, यापुढे हा मनाचा कमकुवतपणा चालू द्यायचा नाही. जी काय आयुष्याची पाच-सहा वर्षे राहिली आहेत,ती वाघासारखी जगायची. मरण आलेच तर, वाघाचे येऊ दे. काही तरी धाडस करायचं.' गाडीच्या वेगामुळे अथवा आणखी काही कारणाने धोक्याच्या साखळीचा खण्खण् आवाज वाढला होता. गणूने एकदा साखळीकडे पाहिले, त्याच्यातील शेर जागा झाला. तो हळूच उठला आणि मनाचा निर्धार करून त्याने साखळीला हात घातला.

कच् कच् आवाज करीत गाडी मधेच थांबली. काही प्रवासी डब्याच्या दोन्ही बाजूनी उडचा मारून पळू लागले. तेवढयात एक गाडी पुण्याकडून शिटचा मारत जोरात येताना दिसली. तेवढयात त्याच रुळावर कोणी तरी कोलमडला, शिटचा मारीत गाडी त्याचेवरून निघून गेली. त्या देहाचे तुकडे रक्ताच्या थारोळयात पडले होते. उदासपणे गणू ते दृश्य पहात होता.

आपण उगाच साखळी ओढली,असं त्याला वाटू लागलं. होणाऱ्या शिक्षेचं त्याला दुःख नव्हतं, पण ही जीवहत्या व्हायला नको होती. पोलिसाची वाट पहात गणू डोळे मिटून स्वस्थ बसून राहिला. परंतु गणूकडे कोणीही आलं नाही.

थोडया वेळानं गाडी चालू झाली.

'काय झाले हो ?' गणूनं शेजाऱ्याला विचारले.

'काही विशेष नाही, नेहमीचेच आहे. हे लोक दररोज या ठिकाणी गाडी थांबवतात. कशाचीच पर्वा नाही याना. स्वतःचा जीव सुद्धा नको झालाय.' असं म्हणत त्या गृहस्थाने घडयाळाकडे पाहिले व पुटपुटला, 'साली गाडी अर्धा तास लेट झाली.'

गणू घरी आला तो खिन्न मनाने. शेवटी एवढेही धाडस आपल्या हातून घडले नाही, याची त्याला खंत वाटत होती. एकदा त्याच्या मनात विचार येऊन गेला, 'आपण साखळी ओढली, पण ते पोलिसांच्या लक्षात आले नसावे.' या विचारानं त्याला थोडं बरं वाटल. घरी आल्यावर तो कमलशी एक शब्द बोलला नाही. त्या रात्री जेवला पण नाही. आल्या आल्या डोक्यावरून चादर घेऊन तो झोपला. कमलला वाटलं, उद्यापासून नोकरी नाही, या कल्पनेने तो बेचैन झाला असावा.

सकाळी अगदी पहाटे उठून गणू बाहेर पडला. केसरी, सकाळ, तरुणभारत सगळी वर्तमानपत्रं घेऊन तो घरी आला. अपघाताचे वृत्त सर्व वर्तमानपत्रांमधे होते. पोलिसानी पाळत ठेऊन विझूमल सावलानी नावाच्या तरुणाला विनाकारण साखळी ओढून गाडी थांबविल्याबद्दल अटक केली होती. गणूच्या लक्षात आले की, साखळी ओढायचं आपण ठरवलं, परंतु ते धाडस आपल्या हातून घडले नाही. केस नसलेल्या डोक्यावरून हात फिरवीत गणूनं समोरच्या भिंतीकडे पाहिले. भिंतीवर वडिलाची तसबीर होती. ते जणू रागावून गणूकडे पहात होते. क्षणभर त्याला वाटले की, वडील भिंतीतून बाहेर येऊन आपल्याला बडवणार त्याच्या आधीच त्याने ती तसबीर उचलली आणि टेबलाच्या खालच्या खणात टाकून दिली त्याचं मन आता शांत झाल होत. डोळे मिटून तो शांतपणे पडला बाहेर कमल मोठयाने ओरडून कोणाशी तरी बोलत होती.

'कमलताई. माझा सकाळ वाचून झाला आहे. पाठवून देऊ का ?' शेजारच्या लिलाताई ओरडून विचारात होत्या.

'नको, नको. अहो हे आज घरी आहेत. सकाळी जाऊन सगळी वर्तमानपत्रं घेऊन आले आहेत,' कमलताई कौतुकाने म्हणाल्या.

'अग बाई विसरलेच. आजपासून तुमच्या संसाराला सुरवात झाली म्हणायची.' लिलाताईंचे चिरके लटके हसू वाडयात सगळयांना ऐकू गेले

□


" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील. "

**पुस्तक पंढरी : ऑगस्ट १९८२ अंक**
**बाँबे बुक क्लब–ऑगस्ट निवड**

# सबला

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा

## पुस्तके

# मुंबई ते बांडुंग

'मुंबई ते बांडुंग' ही मेनका प्रकाशनने प्रसिद्ध केलेली श्री. रमेश मंत्री यांची फार्सिकल विनोदी कादंबरी आहे.

मराठीतील विनोदी साहित्य हे प्रामुख्याने लेख, कथा, नाटक या स्वरूपात आढळते. त्यातील फार्स हा प्रकार तर लेख आणि कथा यांमध्येही क्वचितच दिसून येतो. विनोदी, त्यातूनही फार्सच्या प्रकारात सादर झालेली अशी कादंबरी विरळाच. श्री. रमेश मंत्री यांची 'मुंबई ते बांडुंग' ही कादंबरी त्या दृष्टीने वैशिष्टयपूर्ण वाटते.

मुंबईतील अमेरिकन माहिती खात्याचा प्रमुख हेन्री अँडर्सन. त्याच्या हाताखाली काम करणारा एक अधिकारी मधुसूदन नाडकर्णी. कचेरीच्या कामाच्या निमित्ताने प्रीतम शर्मा या अत्याधुनिक, श्रीमंत स्त्रीशी नाडकर्णी आणि अँडर्सन यांची ओळख होते. अमेरिकेला गेल्यानंतर प्रीतम अँडर्सनला भेट म्हणून आंबे पाठवते. ही भेट म्हणजे लाच ठरते. चौकशीसाठी अँडर्सन आणि नाडकर्णी यांना वॉशिंग्टनला बोलाविले जाते. एव्हाना आंबा-प्रकरणाचे मोठे 'मँगो स्कॅन्डल' अमेरिकेच्या वृत्तपत्रांतून जगभर पसरलेले असते. आंब्यात ट्रान्समीटर वगैरे असल्याच्या बातम्या उठलेल्या असतात. वॉशिंग्टनमध्ये अँडर्सन आणि नाडकर्णी अलग झाल्यावर नाडकर्णी कोठे कोठे गुरफटत गेलेला दिसतो. पोलीस, सी. आय. ए.चे अधिकारी, पत्रकार, अमेरिकन आणि रशियन हेर यांना तोंड देत तो लंडन, कैरो असा कोठे कोठे फिरतो. त्याला स्वत.ची गतीच उरत नाही. सी. आय. ए. चे अधिकारी पाठवतील तेथे जातो. ते सांगतील तो वेष आणि नावे धारण करतो. ते सांगतील ते बोलतो. शेवटी बांडुंग येथे पराक्रम केल्याबद्दल हेन्सी, नाडकर्णी आणि प्रीतम यांचा सत्कार होतो.

आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवर ही कादंबरी घडते. नाडकर्णी पुरा मध्यमवर्गीय आहे; पण विनोदी साहित्यात मध्यमवर्गीय माणसाच्या बावळटपणाचा एक साचा झाला आहे. नाडकर्णी बावळट नाही. तो चोंबडा आहे. मिस्किल आहे. धिटुकला आहे. तो गोंधळतो; पण घाबरत नाही. प्रत्येक प्रसंगावर त्याची मिस्किल शेरेबाजी आहे. त्यामुळे कादंबरी चुरचुरीत, खुसखुशीत झाली आहे. कादंबरीची सुरवात वास्तववादी आहे. फार्सिकल नाही. 'वॉशिंग्टनला चौकशीसाठी मलाही न्या, ही लाच मिळायला मी पण जबाबदार आहे, अशा प्रकारचे टुमणे नाडकर्णी अँडर्सनच्या मागे लावतो. येथून फार्सला सुरुवात होते आणि अखेरपर्यंत फार्सचा हा सूर कायम राहिला आहे. त्यामुळे सुरवातीचा पाच–सहा पानांचा मजकूर म्हणजे फार्सच्या आधीचे निवेदन वाटते.

फार्सच्या ओघात अनेक विडंबने येऊन जातात. यात अमेरिका, रशिया या बलाढ्य राष्ट्रांच्या एकमेकांवरील हेरगिरीचे विडंबन आहे. अत्यंत जागरूक आणि कार्यक्षम असलेल्या अमेरिकन पत्रकारसृष्टीचे विडंबन आहे. बड्या संस्थांच्या पोकळ कार्याचे, तसेच सो कॉल्ड मुक्त स्त्रियांचे विडंबन आहे. उंची हॉटेलांमधली कर्मचाऱ्यांची यांत्रिक हसरी स्वागते, प्रगत देशातले कमालीचे यांत्रिकीकरण सारेच या विडंबनाच्या सपाटचात सापडले आहे. मात्र या विडंबनात कोण्या राष्ट्राचा, मनुष्यजातीचा, यांत्रिकीकरणाचा, प्रचारमाध्यमाचा कशाचाच कटु उपहास नाही. उलट हेरगिरीतल्या अधिकाऱ्यांच्या चातुर्याचे, सावधानतेचे, पत्रकारांच्या जागरूकतेचे अगदी निखळ कौतुक त्यात प्रतिबिंबित होते. त्यामुळे या कादंबरीतील विनोद अधिक निर्मळ, मनमोकळा वाटतो.

जगातल्या बड्या शहरांची झोकदार पार्श्वभूमी, हेरगिरीमुळे निर्माण झालेले रहस्यमय वातावरण, त्यात वावरणारा धिटुकला, मिस्किल नायक, त्याचे मार्मिक विडंबनात्मक कथन यामुळे 'मुंबई ते बांडुंग' ही कादंबरी मनोरंजक झाली आहे. ¤

**मुंबई ते बांडुंग**
लेखक : श्री. रमेश मंत्री
मेनका प्रकाशन
पृष्ठे : १४०, मूल्य : रु. ३०–००

# मागे परतोनी पाहे

सौ. कमलाताई धारप यांनी लिहिलेले हे पहिलेच पुस्तक. सहा दशकांच्या वाटचालीनंतर जुन्या आठवणींच्या बासनात गवसलेले अनुभव या माईआजींनी आपल्या नातवंडांसाठी लिहिले आहेत. पुढील पिढीला जुने रीतिरिवाज कळतील असा या लेखनाचा मर्यादित हेतु आहे.

स्वत:च्या काळातील रूढी, बारीकसारीक रीती लेखिकेने सांगितल्या आहेत. मासिकपाळी, बाळंतपण, ग्रहण या वेळेचे सौ. कमलाताईंनी सांगितलेले सोपस्कार वाचताना आता हसू येते. 'त्या काळी मासिकपाळीचे फार प्रस्थ होते. आमच्या वाड्यात ज्या मासिकपाळी सुरू झालेल्या मुली शाळेत जात, त्यांना तिसरे दिवशी रात्री दौतीतील शाई ओतून द्यावी लागे व पुस्तके चांदणी–दर्शनाकरता रात्रभर उघड्यावर टाकावी लागत.' गरोदरपणातील, बाळंतपणातील आणि ग्रहणाच्या विटाळाची अशी अनेक कर्मकांडे सौ. कमलाताईंनी सांगितली आहेत. ती वाचताना अनेक गोष्टी मनात येतात. साधारण १९२५ पासूनचा काळ या पुस्तकात आहे. या काळातील फडके, खांडेकर, माधव ज्युलियन वगैरेंचे साहित्य वाचले तर इतक्या रूढिग्रस्त समाजाचे चित्र त्यात दिसत नाही. महाविद्यालयीन रम्य जीवन, तरुण–तरुणींचे सुंदर प्रेमविश्व त्या काळातल्या साहित्यात कित्येक ठिकाणी दिसते. सौ. कमलाबाईंच्या पुस्तकात दिसणारे त्यांचे जीवन ह. ना. आपट्यांच्या कादंबऱ्यातील वाटते. एकाच काळी समाजाचे पुढचे टोक बहुधा फडक्यांच्या कादंबरीतले जीवन जगत होते आणि दुसरे मागे राहिलेले टोक अजून ह. ना. आपट्यांच्या काळचेच जीवन जगत होते, असे हे पुस्तक वाचून वाटते.

आपल्या पुस्तकात सौ. कमलाताईंनी केवळ रीतीभातीच सांगितलेल्या नाहीत, तर इतरही अनेक आठवणी सांगितल्या आहेत. त्या आठवणींतूनही त्या काळाचे अगदी सहज दर्शन होते. त्यात सुभाषबाबूंचे दर्शन आहे. गांधीवधानंतर घराला लागलेली आग

आहे. चळवळीच्या दिवसांतील प्रभातफेरी आहे मनुष्यस्वभावाची गमत क्वचित दिसते. 'कोपरगावला ( १९३० साली ) आमच्या बँकेच्या शॉपचा मुकादम कारभारी म्हणून होता. तो रोज हातावर मिस्री घेऊन प्रभातफेरीत भाग घेत असे. मी म्हटले की, 'कारभारी पाटील, मिरवणुकीला मिस्री लावत कशाला जाता ?' ते म्हणाले, 'बाई, सरळ गेलो तर ठीक. मध्ये पोलिसाने पकडले तर पटकन रस्त्याच्या बाजूला मी दात घासतो आहे, म्हणून मोकळे !' खेडेगावातील वास्तव्यातल्या अशा अनेक आठवणी सौ. कमलाताईंनी कथन केल्या आहेत. त्यात बँकेतला प्रामाणिक शिपाई आहे, तसाच हमालीचे काम करणारा प्रामाणिक मुलगा आहे. खेड्यातल्या निवडणुकाही या आठवणीत डोकावल्या आहेत. बेलापूरचा तबूतला मुका सिनेमा आहे. तेथे पडद्याच्या मागच्या बाजूला बसून बायकाना उलटी चित्रे पहायला लागत असल्याचे वर्णन आहे. या सगळ्या आठवणीतून त्या काळातले साधे-सरळ, विश्वासाचे, शात, जीवन दिसते. असाच एक प्रसंग–'आम्ही नंदुरबारला होतो, तेव्हा घडलेली हकीगत. शहादे गावाहून एक बाई दोनच्या मोटारीने साक्रीला आपल्या पहिलटकरीण मुलीला बाळंतपणासाठी घेऊन चालल्या होत्या. त्या दिवशी साक्री गाडी निघून गेली. त्यामुळे आता रात्रीचा मुक्काम कोठे करणार, अशा विचारात पडल्या. स्टँडवरील सामान उचलणाऱ्या एका पोऱ्याला म्हणाल्या की, आम्हाला एखाद्या ब्राह्मणाच्या घरी पोचवतोस का ? तो पोऱ्या म्हणाला, 'इथे एका बँकेचे साहेब रहातात. बामण आहेत. येता का ?' त्या म्हणाल्या, 'चल.' त्या घरी आल्या. मी या म्हटले; पण ओळखले नाही त्यानी घडलेली सारी हकीगत सागितली व रात्रभर राहू का, म्हणून विचारले. मी लगेच हो म्हटले व पिठले-भात करून जेवणे केली. 'हे' घरी नव्हते, तरी मला भीती वाटली नाही व त्याना पण वाटली नाही. सकाळी त्या चहा घेऊन गेल्या. त्या वेळेस हल्लीसारखी बनवाबनवी, पळवापळवी वगैरे काही नव्हते. अनोळखी घराबद्दल, अनोळखी पाहुण्याबद्दल मनात काहीही आले नाही. हे सर्व आता कुठे गेले असे मात्र वाटते.'

या सगळ्या आठवणीमध्ये सचोटीचे प्रसंग बरेच दिसतात. दु:खाचे, संतापाचे प्रसंग मात्र दिसत नाहीत, याचे आश्चर्य वाटते.

सुबोध शैली, भरगच्च आठवणी यामुळे मनोरंजक झालेले हे पुस्तक आहे. ¤

'मागे परतोनी पाहे'
लेखिका : सौ. कमलाताई धारप
उषा प्रकाशन, नागपूर
पृष्ठे ८०, मूल्य रु. १२–०० □

## दीपावली शुभेच्छा : साभार स्वीकार

- एच. आर बर्वे, पुणे
- गोपालजी ठक्कर, पुणे
- स्टुडिओ पर्करसन, पुणे
- स्नेहालय, पुणे
- मोहन मैथिली कुलकर्णी
- केमोक्रॅटस् केमिकल्स अँड फार्मासिटिकल्स, पुणे
- सु. ल. सोमण, मुबई
- पुरदरे प्रकाशन, स्प्रिंग वॉटर ड्रिलर्स, पुणे
- शिवाजी सिताराम जवळकर, सोलापूर
- बाबू उडुपी, पुणे
- श्री. लेखन वाचन भाडार, पुणे
- उल्हास–पन्ना लुकतुके, पुणे
- दिनकर भिकाजी मोकळ, मुंबई
- महाराष्ट्र शिक्षक क्रातिदल, बार्शी
- साधना साप्ताहिक, अहमदाबाद
- आनद बागलकोटे, मिरज
- दीनानाथ लाड, संभाजी महाडीक, मुबई
- काळेज गुडस कॅरिअर्स, पुणे
- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुणे
- पी. वर्मा फार्मसी प्रायव्हेट लि.
- मोहन दिनकर फाटक, डोंबिवली
- विनय गुणे, संगमनेर
- एस. एस. खेर, मुबई
- तुकाराम कोकजे, मिलिंद कोकजे, मुलुड
- खाडिलकर प्रोसेस स्टुडिओ, प्रिंट लिंक प्रिंटेज, पुणे
- डॉ. शरद राखे, अहमदाबाद
- शहा ब्रदर्स, पुणे
- उत्तम जाहिरात वितरक, पुणे
- शुभदा ग्रंथप्रसार केंद्र, डोंबिवली
- सुहास बाक्रे, माधवी बाक्रे, ठाणे
- दिलीप कुलकर्णी, पुणे
- कमलेश कॉन्स कपनी, पुणे
- महेश आत्माराम कुलकर्णी, चारुशिला कुलकर्णी, पुणे
- पद्माकर सोहोनी, वसुधा सोहोनी, पुणे
- यशवंत–सौ. सुजाता ठकार, पुणे
- डॉ. राजा दाडेकर, चिखलगाव
- केदार हावळ, पुणे
- प्रकाश प्रिंटर्स, पुणे
- स्टेप इन प्रोसेसेस, पुणे
- दिवगी मेटल वेअर्स एम्प्लॉईज असो. पुणे
- जी. एस. हवालदार, पुणे
- ओक सनब्रेकर्स, पुणे
- प्रोग्रॅफ अॅडव्हरटायझिंग, पुणे
- बिल्ड क्विक अँड को. मुबई
- सी. एम. भावे, पुणे
- रचना प्रॉडक्टस्, पुणे
- मे. दीक्षित–देसाई, पुणे
- अर्जुनवाडकर असोसिएटस्, पुणे
- स्वस्तिक ट्रॅक्टर्स, पुणे
- सुशीला जोशी, अहमदाबाद
- उमेश काशिनाथ वाटवे, कवठेमहांकाळ
- प्रा. जवाहर मुथा, अहमदनगर
- विजय शकरराव गिरमे, माळीनगर
- अरविंद वाघमारे, परभणी
- शहा न्यूज एजन्सी, परभणी
- सतीश नाईक–नीता नाईक, मुंबई
- रमण सिसोदिया, नाशिक
- श्रीचद भतीजा–स्वाती भतीजा, पुणे
- सिद्धार्थ ट्रॅव्हल्स, पुणे
- व्ही. बी. अभ्यंकर अँड ब्रदर्स, पुणे
- मे. हिल टॉप प्रॉडक्टस्
- गिरीश बापट, पुणे
- एस्. व्ही. नगरकर, पुणे
- डी. आर. पेंडसे, मुबई
- सौ. आशा गद्रे, मुलुड
- एस. पी. कुलकर्णी, पुणे
- आईज् अॅडव्हरटायझिंग, पुणे
- एस्. एच् पराजपे, पुणे
- मे. वेस्टर्न महाराष्ट्र डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, पुणे
- वनाझ इजिनिअर्स एम्प्लॉइज युनियन, पुणे
- मे. डेव्हिड ब्राउन ग्रीव्हज् क. लि. पुणे
- स्नेहल प्रिंटर्स, पुणे
- श्री. एस. एन. बल्लाळवार, अहमदनगर
- एस. एस. वासन, पुणे
- दादा कोंडके, मुबई □

साप्ताहिक माणूस, राजहंस प्रकाशन, साप्ताहिक मुद्रण.

# ‘ अर्थ ’ : दिलासा देणारी कलाकृती



आय. आय. टी. च्या अतिभव्य दीक्षांत सभागृहात पावसाळयातील एका अंधारलेल्या संध्याकाळी ‘ घटश्राद्ध ’ पाहिला होता. पस्तीस-चाळीसजण असावेत. बरेच कन्नड न समजणारे. सिनेमा संपला तेव्हा सगळेच सुन्न होऊन बसून राहिलो होतो एवढे स्मरते. त्या वेळी यमनाक्काने केलेली जखम नंतरदेखील बरेच दिवस खुपत राहिली होती. नंतर एकदा फासबिंडरचा ‘ मॅरेज ऑफ मारिया ब्राउन’ पाहिला. सिनेमा सगळा कळला, असे म्हणण्याइतका काही मी जाणकार नाही; पण चित्रपटाच्या शेवटी मनात घर करून राहिलेली अस्वस्थता, एकलेपणाची भीती अन् दाबून ठेवलेले बरेच काही वर उसळून आले होते. त्या वेळी उठताना जाणवलेला पोटातला खड्डा अजूनदेखील आठवतो.

‘ अर्थ ’ पाहून बाहेर येताना सिनेमाच्या शेवटी ‘ राज ’ने डोळयातून निपटून टाकलेले पाणी आपल्या डोळयातदेखील असते. जीवनात जोडीदाराचे दान उलटे पडलेल्या ओळखीतल्या तरुण बहिणी व मैत्रिणींच्या दुःखाचा सल थोडा सुसह्य झाल्यासारखा वाटतो. एक वेगळयाच प्रकारे दिलासा देणारे (Assuring) समाधान घेऊन आपण बाहेर येतो. वरील तिन्ही अनुभवांची जात वेगवेगळी असली तरी त्या चित्रपटांचे शेवट मनात कुठे तरी एक कायमची खोल आठवण ठेऊन जातात.

चित्रपटाचे एक आगळेपण म्हणजे दिग्दर्शकाला जे काही सांगावयाचे आहे ते तो सरळ सरळ मांडतो आहे. प्रतिमांचा वापर, सूचकता ह्यांचा अतिरेक केल्याचे कुठेही दिसत नाही. ‘ आर्ट फिल्म ’ म्हणवण्यासाठी चित्रपटात दुर्बोधता आणण्याचा मोह दिग्दर्शकाने यशस्वीपणे टाळला आहे. त्याबरोबरीनेच धंद्यावर नजर ठेवून त्याने कोणत्याही प्रकारची तडजोड केलेलीही दिसत नाही. सर्वसाधारण प्रेक्षकाला डोळयांसमोर ठेवून चित्रपट काढला की, ‘ धंदेवाईक बावळटपणा ’ करावा लागतोच, ह्या गैरसमजुतीला ‘ अर्थ ’च्या यशाने जोरदार धक्का दिला आहे. ‘अर्थ’चा शेवट हा चित्रपटाचा प्राण आहे. तो अतिशय हृद्य आहे. संयमित आहे. बहुसंख्य प्रेक्षकांना तो आवडून जातो आणि पटतोदेखील आणि हेच एका अर्थाने दिग्दर्शकाचे यश आहे.

चित्रपटाच्या शेवटाप्रमाणेच चित्रपटातही हा तोल फार सुंदर रीतीने साधला गेला आहे. संपूर्ण चित्रपट म्हणजे शब्दांचे अन् तंत्राचे आशयावर कोणतेही आक्रमण न झालेली एक सुंदर, वृत्तबद्ध कविता आहे. तिच्या ह्या सुगमतेमुळे समीक्षक व जाणकार कदाचित नाखूष होतील; पण त्यामुळे जे काही सांगावयाचे त्यावर मर्यादा पडल्याचे कोठेही जाणवत नाही, हे निश्चित.

चित्रपटाची कथा ‘ Other Woman ’ ह्या प्रकारातलीच आहे. मात्र थकलेला, व प्रेयसीने धिःकारलेला नवरा परत आल्यावर पत्नीने घेतलेला निर्णय प्रेक्षकाला सौम्यसा धक्का देतो. अर्थात हा निर्णय चित्रपटसृष्टीला अगदी नवीन नाही. नुकत्याच येऊन गेलेल्या जब्बार पटेलच्या ‘ उंबरठा ’ची नायिका व विनोद पांडेच्या ‘ एक बार फिर ’ ची नायिका, दोघींनीही अशा प्रकारचे निर्णय घेतलेले आहेत; परंतु ‘ अर्थ ’च्या नायिकेचा निर्णय व चित्रपटाचा शेवटदेखील त्यांच्यापेक्षा थोडासा वेगळा आहे. ‘ उंबरठा ’च्या नायिकेच्या निर्णयात तिच्या सामाजिक कार्याच्या पार्श्वभूमीचा एक महत्त्वाचा भाग आहे. जरी तो तिचा पूर्णपणे व्यक्तिगत निर्णय असला तरी तिची सामाजिक कार्याची प्रेरणा ही त्यामागे आहे. सामाजिक कार्यातील अनुभवामुळे आलेले धैर्य आहे आणि मुख्य म्हणजे सामाजिक कार्याचे पाठबळ त्यामागे आहे. ‘ अर्थ ’मधील नायिकेचा निर्णय हा पूर्णपणे व्यक्तिगत आहे. ती करिअरिस्ट नाही. तिला बौद्धिक उपासमारीची समस्या जाणवत नाही. तिला घराबाहेर पडून सामाजिक अथवा संशोधन कार्य करावयाचे नाही. (उलटपक्षी, स्वतःचे घर असावे अशी तीव्र मनीषा तिच्या मनात आहे. ) आणि म्हणूनच तो शंभर टक्के व्यक्तिसापेक्ष निर्णय आहे. अशा प्रकारे ‘ अर्थ ’मध्ये दिग्दर्शक सरळ सरळ समस्येच्या गाभ्यालाच हात घालतो. एक स्वतंत्र, सार्वभौम व्यक्ती म्हणून स्त्री-नायिकेने समाजातील रूढ दडपणांना व खोटया समजुतींना न जुमानता घेतलेला हा निर्णय निश्चितच नवी वाट दाखवणारा ठरतो. ‘एक बार फिर’च्या नायिकेपेक्षा हा निर्णय अधिक मॅच्युअर वाटतो. तिचा प्रवास एका पुरुषाकडून दुसऱ्या पुरुषाकडे आहे. ‘ अर्थ ’मध्ये राज शेवटी नायिकेला सांगतो, ‘ अब तुम्हे किसी मल्होत्रा या राज की जरूरत नही पडेगी ! ’

नायिकेचा हा प्रवास जास्त होकारात्मक (पॉझिटिव्ह) वाटतो. चित्रपटाच्या शेवटाला त्यामुळेच एक होकारात्मक व दिलासा देणारे (ॲश्युरिंग) परिमाण लाभते.

## संघर्षाचे वेगळे परिमाण

येथे 'अर्थ'च्या निमित्ताने एका महत्त्वाच्या समस्येकडे पुन्हा लक्ष वेधले जाते. सती, बालविवाह, केशवपन इथपासून सुरू झालेला भारतीय स्त्रीचा प्रवास स्वातंत्र्यापर्यंतच्या एका टप्प्यापर्यंत येऊन पोहोचला होता (त्या संदर्भात 'भारतीय स्त्री' ह्यातून मर्यादित अर्थच अपेक्षित आहे.) स्त्री-जागृती व स्त्रियांची प्रगती ह्यासाठी स्त्री-शिक्षण अत्यावश्यक आहे व त्याद्वारे एकदा ज्ञानाची कवडे स्त्रियांना खुली केली की ह्या दृष्टीने काही तरी भरीव घडेल, अशी आशा समाजधुरीणांना होती. फुले पती-पत्नी, अण्णासाहेब कर्वे ह्यासारख्यांच्या अथक प्रयत्नामुळे आज स्त्री-शिक्षण हे अप्रूप राहिलेले नाही. परंतु पदवीधर होऊन, पदव्युत्तर शिक्षण होऊन, बँका, शिक्षणसंस्था, संशोधनसंस्थांमध्ये जबाबदाऱ्या पेलणाऱ्या स्त्रिया आज फेमिना, साड्या, कुसुम अभ्यंकर, वटपौर्णिमा आणि हरतालिका ह्या चक्रात फिरताना पाहून कपाळावर हात मारून घेणारे कर्वे डोळ्यांसमोर उभे राहतात. स्त्रियांसाठी ज्ञानाची कवाडे उघडली खरी, पण त्या संधीचा उपयोग करून घेऊन आपल्याभोवतालची कोंडी फोडण्यात स्त्रिया अजून यशस्वी झालेल्या नाहीत. स्वातंत्र्योत्तर काळात (महायुद्धानंतर) बदललेल्या आर्थिक परिस्थितीमध्ये मध्यमवर्गीय स्त्रियांनादेखील अर्थार्जनासाठी घराबाहेर पडावे लागले. सर्वांगीण स्वावलंबनाची व त्याद्वारे प्रगतीची ही आणखी एक चांगली संधी स्त्रियांना मिळाली होती. परंतु त्यांचे अर्थार्जन हे आर्थिक स्वावलंबनामध्ये परिवर्तित होऊ शकले नाही. सर्वांगीण स्वातंत्र्याची व प्रगतीची ही पहिली पायरीदेखील स्त्रिया गाठू शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांची प्रगती एका टप्प्यावर कुंठित झालेली दिसते!

कलाकारांच्या संवेदनशीलतेमुळे समाजाच्या भविष्यकालीन वाटचालीचा वेध तो आपल्या कलाकृतीद्वारे घेऊ शकतो, असे म्हटले जाते. भविष्यकाळात ही कोंडी फोडण्याचे सामर्थ्य स्त्रियांमध्ये येईल, समाजाने व त्यांनी स्वतः त्यांच्याभोवती उभारलेल्या भिंती फोडून व्यक्ती म्हणून स्वतंत्र आयुष्य त्या जगू शकतील, असा आशावाद ह्या सर्व कलाकृतीमध्ये दिसतो. 'एक बार फिर'ची नायिका नवऱ्याला सोडून स्वतःला आवडलेल्या पुरुषाकडे निघून जाते. 'उंबरठा'-मधील नायिका समाजकार्यासाठी घर-संसाराचा त्याग करते. 'अर्थ'ची नायिका दुसऱ्या स्त्रीवर प्रेम करणाऱ्या नवऱ्याचा परत स्वीकार करण्यास नकार देते. एवढेच नव्हे, तर स्वतःच्या पायावर उभी राहून एका नव्या आयुष्याची सुरुवात करते. अर्थार्जनाच्या पुढच्या पायऱ्या पार करून जीवनाची वाटचाल संपूर्णपणे स्वतःच्या बळावर करण्याचा निर्णय घेणाऱ्या ह्या नायिका उद्याच्या 'स्त्री'च्या प्रतिनिधी ठरतील, असा दिलासा देणारा आशावाद बाळगणे भाबडेपणाचे ठरणार नाही ना?

'अर्थ'मध्ये स्त्रीच्या कोंडीचा हा प्रश्न फक्त नायिकेपुरता मर्यादित ठेवलेला नाही. तीन वेगवेगळ्या पातळ्यांवरून दिग्दर्शक ती समस्या मांडतो. नायिकेच्या बरोबरीने कविता (other woman) व मोलकरीण ह्यांच्याद्वारा दिग्दर्शकाने ह्या समस्येची दुसरी दोन रुपे मांडली आहेत. कविता हीदेखील सुशिक्षित स्त्रियांमध्ये आज सर्वत्र आढळणाऱ्या 'सिक्युरिटी सिंड्रोम'ची बळी आहे. प्रियकराचा घर-संसार सांभाळण्याइतके आर्थिक बळ व कर्तृत्व असणारी कविता त्याच्याकडून आधार व सिक्युरिटीची अपेक्षा ठेवून असते. तिसऱ्या पातळीवरून श्रमजीवी स्त्रियांची समस्या तितक्याच भेदक रीतीने दिग्दर्शकाने मांडली आहे. नायिकेच्या घरातील मोलकरणीच्या दारिद्र्याविरुद्ध तसेच दारुड्या, बेकार नवऱ्याविरुद्ध चाललेल्या संघर्षाला एक वेगळे परिमाण आहे. स्वतःच्या भल्यापेक्षा आपल्या मुलीला शिक्षण देण्यासाठी ती झगडते आहे. पुढच्या पिढीतल्या स्त्रीला प्रगतीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्त्रीने केलेला संघर्ष मांडताना दिग्दर्शक आपल्याला समस्येच्या उत्तराकडे अभावितपणे घेऊन जातो.

चित्रपटात जागोजागी वेगवेगळ्या स्त्रियांमध्ये एकप्रकारची 'कॉम्रेडशिप' दाखवण्याचा दिग्दर्शकाचा प्रयत्न आहे. नायिका वेळोवेळी आपल्या मोलकरणीच्या पाठीशी उभी राहते. ती तुरुंगात गेल्यावर तिला आधार देते. तिच्या अनाथ मुलीची संपूर्ण जबाबदारी घेते. नायिका पूजा व other woman कवितामधल्या सुरवातीच्या संघर्षानंतर त्या दोघींमध्येही एक प्रकारची परस्पर सहानुभूती जाणवते. नायिकेचे कवितला भेटायला येणे. त्या वेळी कवितेने मला तुझे घर उध्वस्त करायचे नव्हते, असे सांगणे ह्यातून दोघींना परस्पराच्या दुःखाबद्दल असलेली जाण स्पष्ट दिसून येते. मोलकरीणदेखील तिच्या दुःखाचे मूळ असणाऱ्या तिच्या नवऱ्याच्या रखेलीबद्दल कडवटपणे न बोलता 'वो बेचारी क्या करेगी? उसको भी कल रात बहोत मारा उसने,' असे म्हणते. ह्या सगळ्यामधून दिग्दर्शक कोणताही प्रचारकी आव न आणता बरेच काही सुचवून जातो, हे निश्चित.

'अर्थ'मधून दिग्दर्शकाने आणखी एक मुद्दा जोरदारपणे मांडला आहे. 'स्त्री'ला लग्नबंधनामधून सुरक्षितता व आधार यांची जी अपेक्षा असते, त्यातला वैय्यर्थ तीनही स्त्रियांच्या माध्यमातून दिग्दर्शकाने मांडला आहे. श्रमजीवीवर्गातील मोलकरणीचा नवरा तिला आधार अथवा सुरक्षितता काहीच देऊ शकत नाही. उलट तो तिच्या सर्वनाशाला कारणीभूत होतो. सात वर्षांनंतरदेखील एका सहीने तुटू शकणाऱ्या लग्नबंधनातून कोणत्या प्रकारची सुरक्षितता मिळणार, ह्या प्रश्न त्याच्या नकारार्थी उत्तरासह सुशिक्षित, पांढरपेशा समाजातील स्त्रीच्या प्रतिनिधी असलेल्या नायिका पूजा व कविता दोघीही जोरदारपणे मांडतात.

## कोंडी फुटेल का?

बऱ्याच जणांना स्त्री-स्वातंत्र्याची कल्पना व त्यातून ध्वनित होणाऱ्या इतर गोष्टी (उदा. लग्नबंधनातील वैय्यर्थ) पोरकट वाटतात. त्यातून स्वैराचार बोकाळेल, कुटुंबसंस्था व पर्यायाने समाज कोसळून पडेल, अशी भीती व्यक्त केली जाते. लग्नबंधन नाकारणाऱ्या ह्या नायिका एक प्रकारे समाजाच्या सांस्कृतिक अधोगतीचे दर्शन घडवतात, असेही मत व्यक्त केले जाते. समाजजीवनाच्या आर्थिक क्षेत्रात आधुनिक यंत्रयुगीन संस्कृती स्वीकारल्यानंतर त्याचे पड-

साद सामाजिक, तसेच सांस्कृतिक क्षेत्रात उमटणे अपरिहार्य आहे. ह्या पडसादांकडे वाळूत तोंड खुपसणाऱ्या शहामृगाच्या भूमिकेतून न पाहता अधिक डोळसपणे व समजूतदारपणे पाहणे आवश्यक आहे. ह्या बदलत्या परिस्थितीमध्ये (ट्रान्झिशन पीरिअड) कोंडी फोडण्याच्या प्रयत्नात अतिरेक अथवा कडवटपणा कदाचित येईलही. परंतु त्यानंतर बदललेल्या परिस्थितीमध्ये नवस्वतंत्र व मुक्त स्त्रीची भूमिका नकारात्मक व समाजविघातक राहील, असे मानणे अन्यायाचे ठरेल. 'अर्थ'च्या नायिकेने मोलकरणीच्या अनाथ मुलीला सांभाळण्याचा घेतलेला निर्णय, तसाच तिने मातृत्वासंबंधी दाखवलेला आदर ह्या सर्व शंकाना चपखलपणे उत्तर देतात.

'अर्थ' हा परिपूर्ण चित्रपट आहे, असे मात्र नव्हे. अनेक त्रुटी व सैल दुवे नजरेला खुपतात. कविताच्या व्यक्तिरेखेवर अन्याय झाल्यासारखे वाटते. तिचे कपडे, तिचे वागणे प्रथमपासूनच भडक व बटबटीत वाटते. त्यामुळे ती व्यक्तिरेखा अतिसंवेदनाशील स्त्रीची न वाटता मानसिकदृष्ट्या कमकुवत स्त्रीची वाटते.

नायिकेनेच विचारलेल्या एका प्रश्नातून एक महत्त्वाचा सैल दुवा लक्षात येतो, परंतु त्या प्रसंगाच्या टेंपोमध्ये तो प्रश्न पटकन मागे पडतो, विसरला जातो. दारूच्या नशेत भर पार्टीत नायिका नवऱ्याला विचारते 'कवितामध्ये तू असे काय पाहिलेस की जे माझ्यामध्ये नाही?' त्यापुढे तीच म्हणते की, 'शय्येवर पत्नीने जी रखेलीची भूमिका पार पाडायची ते काम ही करते आहे!' परंतु ह्यातून नायिका स्वत: ती भूमिका पार पाडू शकत नाही-असा स्पष्ट निर्देश कोठेही नाही. उलट सुरुवातीच्या प्रसंगामधून पति-पत्नीच्या सुखी जीवनाचे चित्र प्रेक्षकाच्या मनात उभे रहाते. त्यामुळे नवरा नायिकेला सोडून जाण्याइतपत कवितेच्या प्रेमात का गुंततो, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. कदाचित मानवी मनाच्या अथांगतेचा हा एक भाग असावा.

दुसरा एक सैल दुवा म्हणजे, नायिका पूजाचे बालपण अनाथालयात गेल्याचा उल्लेख दोन-तीन वेळा येतो. हा उल्लेख जाताजाता केलेला आहे, की दिग्दर्शकाने मुद्दाम त्याची योजना केली आहे, हे अस्पष्टच राहते. कदाचित मोलकरणीच्या अनाथ मुलीचा सांभाळ करण्याच्या तिच्या निर्णयाला दिग्दर्शकाने ही पार्श्वभूमी पुरवली असावी.

'अर्थ'मधील सर्वच कलाकारांचा अभिनय सरस वाठला आहे. स्मिता पाटील, कुलभूषण खरबंदा, राजकिरण ह्यांच्याप्रमाणे 'हरीश'च्या दुय्यम भूमिकेतील अभिनेत्यानेदेखील फार चांगला अभिनय केला आहे. ह्या सर्वांवर कळस म्हणजे शबानाचा नायिकेच्या भूमिकेतला अभिनय. 'भूमिका प्रत्यक्ष जगणे' यासारख्या विशेषणांचे अर्थ इतके गुळगुळीत करून टाकले गेले आहेत की, तिच्या अभिनयाचे वर्णन करावयास मला ते अपुरे वाटतात. छोटे छोटे प्रसंग तिने इतक्या समर्थपणे उभे केले आहेत की, डोळ्यात पाणी यावे. मुद्राभिनय, डोळ्याचा बोलका वापर तिने अप्रतिमपणे केला आहे. प्रसंग सांगत बसलो तर मोठी यादीच होईल. पण शबानाच्या अभिनय कारकीर्दीत 'अर्थ' एक मानाचा तुरा ठरेल हे निश्चित.

'अर्थ'चे संगीत, गाणी चित्रपटाच्या दर्जाला पूरक आहेत असे नव्हे तर ती गाणीदेखील चित्रपटाला वरची उंची गाठण्यास मदत करतात, असे म्हणावेसे वाटते. चित्रा-जगजीतसिंह ह्यांच्या चाहत्यांना मिळालेली ही एक नवीन भेटच आहे. चित्रपटातल्या तीनही गझला अप्रतिम आहेत.

कलाकारांचा अभिनय, दिग्दर्शन, संगीत अन् मुख्य म्हणजे कथानक ह्या सर्व चांगल्या अंगांचा एकत्रित परिणाम प्रेक्षकावर होतो अन् शेवटी एक प्रसन्न, दिलासा देणारी कलाकृती पाहिल्याच्या समाधानात प्रेक्षक बाहेर पडतात.

—सुबोध वागळे

## मार्ग चुकलेला

# शुभकामना

कथाविषय विनोदी पद्धतीने हाताळायचा की गंभीरपणे, याबाबत जर दिग्दर्शकाचाच गोंधळ झाला तर उत्तम कथेचेही कसे वाटोळे होऊ शकते, याचे आणखी एक ताजे उदाहरण म्हणजे नवीन चित्रपट 'शुभकामना'!

राकेश रोशन, रति अग्निहोत्री, उत्पल दत्त अशी 'चलाऊ' नावे असलेला हा चित्रपट, हुंड्यासारखा ज्वलंत विषय मांडूनही अतिशय नीरस आणि कंटाळवाणा झालेला आहे आणि त्यात भर म्हणून की काय कोण जाणे, कंटाळवाणी आणि लांबलचक गाणीही घातली आहेत.

रतन (राकेश रोशन) हा एक हॉटेल-वेटर. अतिशय सद्गुणी आणि परोपकारी वगैरे वगैरे. 'बी. ए. फेल' असूनही लग्नाच्या बाजारात त्याचा भाव चौदा हजारापर्यंत आहे. सुजाता (रति अग्निहोत्री)—डबल एम. ए, अर्थशास्त्राची प्राध्यापिका. कृपाशंकर (उत्पल दत्त) कोट्याधीश. त्याला दोन 'प्लस' म्हणजे दोन मुलगे. दोघांचेही भाव-चार लाख-एक गाडी, परदेशवारी-असे ठरलेले

कृपाशंकर आपला मोठा मुलगा ज्ञान शंकर याच्यासाठी सुजाताला बघायला येतो. मुलाचा भाव बोलतो. सुजाताचा दोन्ही 'मायनस' (दोन्ही मुली) असलेला अगतिक बाप काहीच बोलत नाही. सुजाता मात्र अतिशय स्पष्ट शब्दात कृपाशंकरची कानउघाडणी करते परिणाम म्हणजे तिची नोकरी जाते, घरही सोडावे लागते.

'बघणे' समारंभाला हॉटेलची ऑर्डर घेऊन तिथे गेलेला रतन तिचा सहारा होतो. तिला नोकरी मिळवून देतो, तिचे लग्न एका चांगल्या मुलाशी ठरवून देतो. (ऐनवेळेस 'हृदयाची हृदयाला ओळख पटून' तमाम प्रेक्षकांच्या अपेक्षेप्रमाणे रतन आणि सुजाताच विवाहबद्ध होतात, ही गोष्ट अलाहिदा)

कथेचे मुख्य सूत्र म्हणजे, वरपित्याचा आपल्या मुलाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि एका मुलीने त्याविरुद्ध उभारलेले बंड हुंड्यातली अमानुषता प्रेक्षकाच्या मनावर बिंबवण्यासाठी वधूपित्याच्या तोंडी घातलेले असहायतेचे उद्गार आणि कृपाशंकरच्या तोंडची भाषा जराशी अतिरंजित वाटली तरी योग्य तो परिणाम साधते.

चाळीस हजार किंमत मोजल्यावर (हुंडा) माल ताब्यात मिळालाच पाहिजे, असा युक्तिवाद करून कृपाशंकरच्या धाकट्या मुलाशी प्रेमविवाह केलेली सुजाताची धाकटी बहीण-विजया (किरण वैराळे) कृपाशंकरला वकिलामार्फत नोटीस पाठवते' ही कल्पना बरी; पण बाकी कुठेही नावीन्य जाणवत नाही.

चित्रपटातून काय सांगितले हे प्रेक्षकापर्यंत पोचले की नाही, असा संभ्रम दिग्दर्शकाच्या मनात उत्पन्न झाल्याने चित्रपट संपल्यावर भारताची घटना, गांधीजी, हुंडाबळींच्या बातम्या वगैरे दाखवून परत 'फिल्म डिव्हिजन की भेट' पहात आहोत की काय, असे वाटायला लागते.

त्याहूनही रसभंग करणारी गोष्ट म्हणजे, मधूनच विनोदी आणि मधूनच अतिगंभीर असा चाललेला प्रवास. सुरवातीला काही वेळ तर एक अतिशय उत्कृष्ट 'कॉमेडी' बघायला मिळणार की काय, अशी आशा मनात डोकावली; पण नंतर अचानक आलेल्या गंभीर प्रसंगांनी प्रेक्षक कुठल्याही 'मूड'शी समरस होऊ शकत नाही आणि नवीन काही बघितल्याचे समाधान तिळमात्रही मिळत नाही.

—उज्ज्वला लेले

# नाट्यपंढरी



## □ शनिवारवाडा नि गडकरी !

कै. राम गणेश गडकरी यांचा स्मशान हा 'वीक पॉइंट' (Weak point) होता हे सर्वश्रुत होते. म्हणूनच त्यांचा 'कामण्णा' (भावबंधन) पहिल्याच भेटीत घनःश्यामाला आवर्जून सांगतो 'धाडस ? जगातल्या जगात काय वाटेल ते धाडस करायला सांग. माझा एकच वीक पॉइंट आहे, आणखी तो म्हणजे स्मशान. स्मशानात जायचे नाव काढलेस की प्राणसंकट वाटते बघ !... स्मशानात पाऊल टाकल्याबरोबर माझा मुडदा झालाच म्हणून समज ! जीव गेला तरी मी एकटा म्हणून स्मशानात जाणार नाही !'

गडकरी नेहमी सांगत की, तिन्हीसांजा झाल्या की मी शनिवारवाड्याच्या रस्त्याने जाणार नाही. कारण भागवत (भागवतांचे भूत) तिथे कट्ट्यावर माझी वाट बघत बसतील, मला हाक मारतील, माझा हात धरून मला खाली बसा, म्हणतील, नि सुरुवात करतील 'कमलाकरचा हा प्रवेश इथं यायला पाहिजे. इथे जयंताची एन्ट्री हवी. गोकुळचे स्वगत थोडे कमी करा' इत्यादी.

कारण गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाचे वाचन होऊन भागवतांना ते पसंत पडले होते. 'महाराष्ट्र नाटक मंडळी' ने ते घेतलेही होते. पात्रयोजनासुद्धा झाली होती. स्वतः भागवत 'कमलाकर' करणार होते. नाटक अर्थातच भागवत बसविणार होते. त्यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे स्वभावचित्रण, अभिनय, सीन्स इत्यादी गोष्टींच्या नोटस् सुद्धा काढायला सुरुवात केली होती; पण योग असा की, नाटकांच्या तालमीना सुरुवात होणार, तोच भागवतांनी आत्महत्या करून जगाच्या रंगभूमीवरून कायमची एक्झिट घेतली, म्हणूनच गडकऱ्यांना सारखे वाटायचे की, ठरल्याप्रमाणे, नाटकावर चर्चा करण्यासाठी, नेहमीसारखे भागवत शनिवारवाड्यावर वाट पहाणारच !

रसिकहो, हे भागवत म्हणजेच अभिनयश्रेष्ठ नटवर्य गणपतराव भागवत ! अग्रपूजेचा मान संपादलेले गद्यश्रेष्ठ 'महाराष्ट्र नाटक मंडळी' चे प्रमुख नट नि तालीममास्तर ! मालक नसतानाही कारखानीस, टिपणीसबंधू यांसारख्या मालकमंडळींना दबदबा वाटावा असे गुणसंपन्न नट ! काकासाहेब खाडिलकरांच्या 'कीचकवध' नाटकातले—कीचक ! 'सवाई माधवरावांचा मृत्यू'-तले केशवशास्त्री ! नि 'भाऊबंदकीतले' राघोबा ! हे त्यांचे 'अभिनयबिल्वदल!' आजही ह्या त्यांच्याच खास भूमिका म्हणून ओळखल्या जातात. त्यातही कीचक म्हणजे भागवतच ! त्यावर त्यांचीच मुद्रा कोरली गेली आहे.

भागवत गेल्यावर या भूमिकांसाठी उभे राहणारे नट, मनोमनी भागवतांच्या पायावर नतमस्तक होऊनच रंगपटात प्रवेश करीत असत. मग ते 'केशवशास्त्री' (सवाई माधवरावांचा मृत्यू) समर्थपणे उभा करणारे केशवराव दाते असोत, भागवतांची अपुरी इच्छा पुरी करणारे कमलाकर (प्रेमसन्यास) म्हणून रंगणारे चिंतामणराव कोल्हटकर असोत, नाहीतर खऱ्या राघोबादादाहूनही कदाचित अधिक सुंदर दिसणारे— राघोबा (भाऊबंदकी) नानासाहेब फाटक असोत.

## □ मानाचा शिरपेच !


'महाराष्ट्र नाटक मंडळी' ही सुशिक्षितांची फक्त गद्य नाटके करणारी ध्येयवादी मंडळी ! गुरुवर्य अण्णा कारखानीस, यशवंत नारायण तथा अप्पा टिपणीस नि माधवराव टिपणीस हे बंधू, नि दत्तोपंत देशपांडे हे चार महाडकर कायस्थ कंपनीचे प्रमुख मालक. कंपनीचे मूळ नाव 'महाडकर नाटक मंडळी' हेच होते; पण संस्थेला स्थानिक किंवा जातीय वास येऊ नये म्हणून 'महाराष्ट्र नाटक मंडळी' असे नामकरण केले. सहज सुचले म्हणून सांगतो, या कंपनीचा पहिला खेळ 'कांचनगडची मोहना' हा महाडला लहानपणी सी. डी. (चिंतामणराव) देशमुखांनी पाहिल्याची नोंद त्यांनी आपल्या Course of my life या आत्मचरित्रात्मक ग्रंथात आवर्जून केली आहे. श्री. भाटे, भानू, पानसे, गोविंदराव टिपणीस नि कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकर ही कंपनीची पाठीराखी हितचिंतक विद्वान मंडळी. सहाजिकच लौकरच या संस्थेला नाट्यविद्यापीठाचे स्थान प्राप्त झाले होते. कंपनीचा दर्शनी पडदा (Drop) गंगावतरणाचा होता. 'नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदी दुष्यस्त कामो लघुः' हे संस्थेचे ब्रीदवाक्य होते. Not failure but low aim is crime या इंग्रजी वचनाचे शि. म. परांजपे यांनी केलेले ते संस्कृत सुभाषित होते. हे सर्व सालंकृत, सविस्तर सांगण्याचा हेतू इतकाच की, अशा 'महाराष्ट्र नाटक मंडळी 'चे भागवत हे कर्तुम्-अकर्तुम् नट नि तालीममास्तर होते, यावरून भागवतांच्या कलात्मक नि बौद्धिक उंचीची कल्पना यावी.

त्याची एक अलीकडची खूण म्हणजे, 'भाऊबंदकी' नाटक महाराष्ट्रात भागवतांनीच बसविले होते. 'भागवतांसारखा तालीममास्तर असताना मीच तालमी घेण्याची गरज नाही', असे काकासाहेब खाडिलकरांनी आपले मनोमत स्वच्छ सांगून टाकले होते. अलीकडे १९५८ च्या सुमारास दिल्ली येथे अखिल भारतीय नाट्यमहोत्सव साजरा झाला. सर्व भाषातली नाटके सादर झाली. मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने (केवळ डॉ. अ. ना. भालेराव यांच्या महत् प्रयत्नाने) 'भाऊबंदकी' नाटक सादर करण्यात आले. नानासाहेब फाटक, दुर्गाबाई खोटे, मा. दत्ताराम असे मराठी रंगभूमीवरचे अनेक मातब्बर कलावंत होते. पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, चिंतामणराव देशमुख यांसारखी थोर मंडळी नाटक पहायला उपस्थित होती. दिग्दर्शन होते नटश्रेष्ठ केशवराव दात्यांचे ! शब्दाशब्दाला, वाक्यावाक्याला नाटक चढत होते. रंगत होते. अखेर अपेक्षेप्रमाणे नाटकाला पहिले बक्षीस मिळाले. मराठी माणसांचे दिल्लीत कौतुक झाले. मराठी भाषेचा राजधानीत बहुमान झाला. आनंदी आनंद झाला. मंदिलात शिर-

पेच झळकले !

पण रसिकहो, इथेही आठव येतो, याद येते ती भागवताचीच ! दाते भागवताचे शिष्य ! भागवतांनी १९०९ साली माडलेले ' भाऊबंदकी ' दात्यांच्या नजरेत पक्के होते. ते त्या नाटकात विविध भूमिकात (स्त्रीपार्ट सुद्धा) रंगत होते १९११ सालपर्यंत भागवताचे काम पहात होते. पात्रे बदलत होती, पण पट तोच होता. म्हणजे दात्यांच्या दिग्दर्शनाचा ब्लूप्रिंट (Blue print) भागवतांचाच होता. (बदलत्या रंगभूमीच्या संदर्भात केशवरावानी आपल्या बुद्धीप्रमाणे काही बदल केलेही असतील) पण याचाच अर्थ १९०९ ते १९५८ हा पन्नास वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटूनही, भागवतांच्या अभिनयाचे, दिग्दर्शनाचे महावस्त्र विटले नव्हते, जुने झाले नव्हते, रंग उडाला नव्हता, हेच खरे नाही का ?

बक्षिसाची बातमी कानावर पडताच केशवरावसुद्धा क्षणभर डोळे मिटून भारावलेल्या अंतःकरणाने हात जोडून म्हणाले असतील, 'गुरुवर्य, हे यश तुमचं ! ही पालखी गणेशाची ! (गणपतराव) आम्ही नुसते पालखीच्या दांड्याचे मानकरी ! '



## मुक्काम कोल्हापूर

### प. विभाग विरुद्ध वेस्ट इंडिज

# ' कसोटी 'चा पूर्वटप्पा

१९, २० आणि २१ नोव्हेंबरला इथं खेळल्या गेलेल्या तीन दिवसांच्या वे. इंडिज विरुद्ध प. विभाग क्रिकेट सामन्यात प. विभागाच्या बलविंदर संघूने टॉस जिंकला; पण गोलंदाजी स्वीकारली. म्हणून त्याच्यावर थोडी टीका झाली. त्याला उत्तर देताना तो म्हणाला 'माझ्या संघात धावा करू शकणारे आहेत इन मीन तीन फलंदाज आणि जर मी पहिली फलंदाजी घेतली असती तर (तीन दिवसाचा सामना) दोन दिवसांतच संपला असता येथे पहिला मोठा सामना होत असल्यामुळे कोल्हापूरकराना वेस्ट इंडियन खेळाडूचा खेळ जास्तीत जास्त बघावयास मिळावा, हीच माझी इच्छा होती. ' तो हेतू साध्य झाला व व हा सामना अनिर्णितावस्थेत संपला. यात वेस्ट इंडियन्स दोनदा इनिंग खेळले. हेच या सामन्याचं सार.

क्रीडाक्षेत्रात राजकारण वा कलाक्षेत्रात गटबाजी या गोष्टी मुळीच नव्या नव्हेत. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनमध्ये एक नाट्य रंगलं होत. 'कोल्हापूरला हा सामना मिळाला तो दबावानं !' या आरोपाची परिणती क्रिकेटमहर्षी देवधर याच्या राजिनाम्यात झाली, हे सर्वश्रुतच आहे केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री एन. के. पी. साळवे, इथले खासदार-आमदार आणि महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनवरचे प्रतिनिधी या सर्वांनी हा सामना इथं पुण्याच्या विरोधात खेचून आणला. तसं पुण्याचं आणि कोल्हापूरचं पूर्वीपासून जरा कमीच पटतं. तेव्हा राजकारण, इथल्या क्रिकेटप्रेमिकांची जबर इच्छा, सामूहिक प्रयत्न आणि योगायोग या साऱ्यामुळं इथं हा सामना झाला व यशस्वीरित्या पार पाडला गेला. आंतरराष्ट्रीय दर्जाचा हा सामना कोल्हापूरच्या क्रिकेट इतिहासात प्रथमच झाल्यानं उत्साह अमाप होता व तो तितकाच टिकलाही.

प्रत्यक्ष खेळ कसा झाला, हे वृत्तपत्रानी सांगितलेच आहे. मुंबई-टेस्टसाठी प्रॅक्टिस व न खेळलेल्यांना खेळवणे हे दोन हेतू वेस्ट इंडिज खेळाडूनी साध्य करून घेतले. प. विभागातील गुलाम परकारनं छान फटकेबाजी केली व रिची रिचर्डसन हा मॅन ऑफ द मॅच ठरला, हे त्यातील हायलाइटस होत; पण संपूर्ण सामना होत असताना व झाल्या. नतर ज्या प्रतिक्रिया क्रिकेटमधल्या थोरामोठ्याकडून व्यक्त झाल्या त्या कोल्हापूरच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरतील.

वेस्ट इंडिज संघाचे व्यवस्थापक वेस्ली हॉल, सामन्याचे पंच महंमद गौस व घोष, बापू नाडकर्णी आणि इतर अनेक मान्यवरानी व्यक्त केलेली सर्वांत महत्त्वाची प्रतिक्रिया ही इथल्या खेळपट्टीबाबतची आहे. 'ही खेळपट्टी अहमदाबाद वा दिल्ली पेक्षाही चागली व कसोटी दर्जाची आहे ' हा त्यांचा यावरचा अभिप्राय. खेळाडूना इथली फाइव्ह स्टार हॉटेल नसणारी परिस्थिती खटकली नाही, नागपूरपेक्षाही व्यवस्था आवडली, इथल वातावरण आवडलं आणि म्हणून मग आता कोल्हापूरकरांनी एक दिवसाचा आतरराष्ट्रीय व त्यापुढे कसोटी सामना याची स्वप्न बघायला सुरुवात केलीय इथल्या क्रिकेट असोसिएशनचे एक पदाधिकारी श्री मोहन मुडंबर म्हणाले, 'आमच्याकडं जिद्द आहे, पाठिंबा आहे, पैसा उभारण्याची ताकद आहे पण आम्हाला महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच सहकार्य हवं. ' त्यानी या सामन्याच, 'कसोटी मिळवण्याच्या मार्गातील एक टप्पा ' असं वर्णन म्हणूनच केलं.

ज्या ठिकाणी सामना झाला त्या शिवाजी स्टेडियमला यातून काही भरीव रक्कम बाधकामाला मिळेल, असही श्री. मुडंबर म्हणाले. 'सरकारी ऑफिसेस व इतरत्र तिकिटखरेदीची सक्ती न करताही हा सामना ओव्हरफुल्ल झाला तो इथल्या व दक्षिण महाराष्ट्राच्या क्रिकेटप्रेमानच ' ही त्याची प्रतिक्रिया या भागाला टेस्ट देण्याच्या विचाराच्या सदर्भात लक्षणीय .

### मराठी धावतं वर्णन

सध्या महाराष्ट्र टाइम्समध्ये मराठी कॉमेंट्रीबाबत थोडी चर्चा चालू आहे. नागपूरकरानी कसोटीच्या वेळी मराठीवर कसा अन्याय केला किंवा पुण्याच्या आकाशवाणी नंही परवाच्या सामन्याच्यावेळी मराठीला कसं डावलल, याची वर्णनं बहुधा सर्वांनी वाचली असणार. जेव्हा आकाशवाणीवर प्रथम हिंदीतून वर्णन सुरू झाली होती तेव्हा लोकानी त्या हिंदीवर टीका केली व ती कानाला टोचते म्हणून तक्रार केली; पण पुढं केवळ सवयीनच नव्हे तर सुशील दोशी किंवा मुरली मनोहर मंजूलसारख्या कॉमेंटेटर्सनी ती लोकप्रिय केली. (एक्सपर्टस्‌ना हिंदीत सांगणं नीट जमल नाही.) जेव्हा मराठीत कॉमेंट्री सुरू झाली तेव्हा तर श्रोत्याना कससच वाटल. एक तर नरेन तामणेंच्या सथ व निर्जीव कॉमेंट्स आणि अर्धीकच्ची मराठी जिचा श्रोत्यांवर कसलाच प्रभाव पडला नाही; पण या परिस्थितीत फरक पडला म्हणण मुश्कील आहे. हिंदीप्रमाणं सुधारणा

झाल्या नसतील म्हणून अजूनही या मराठीला लोकप्रियता मिळाली नसणार, हा तर्क म्हणूनच सुसगत ठरावा.

कोल्हापूरला प्रथम मराठीतून कॉमेंट्री घ्यायच ठरलच नव्हत. मला तर प्रथम श्री. भुइबरानी 'मराठी हवी आहे आम्हाला. कारण ग्रामीण भागात जरा तीच बरी पडते,' अस सागितलं होत. ( ग्रामीण भागात नेमकी ती किती लोकप्रिय आहे, हा एक प्रश्नच आहे) पुढं मराठीतून वर्णन ऐकवण्यात आलं. ते फार चागलं होतं, असं म्हणण्यात हशील नाही जेव्हा मराठीचा अट्टाहास धरला जातो तेव्हा तिची लोकप्रियता वाढविण्याची जबाबदारीही असते, हे विसरणं ठीक नव्हे. मराठी हवी आहे, पण साधी आणि महत्त्वाचं म्हणजे ती रोचकही हवी

—सुनील धोपेश्वरकर

## राणी, आम्हाला क्षमा कर !

पृष्ठ १ वरून

दृश्य कॅमेऱ्यात टिपून आपल्या अकाच्या पहिल्या पानावर वाचकांना त्याचं दर्शन घडवल. हे सार अपुरं वाटलं म्हणून की काय, पुण्याजवळच्या राष्ट्रीय सरक्षण प्रबोधिकेला राणीने २१ तारखेला भेट दिली तेव्हा तिथल्या कॅडेटसनी तिला रिवाजानुसार मानवंदना दिलीच, शिवाय 'राणी एलिझाबेथ झिंदाबाद'च्या घोषणाही दिल्या. प्रादेशिक भाषामधली वृत्तपत्रं या वावटळीपासून स्वत चा बचाव करू शकली असती; पण पीटीआय, यूएनआयसारख्या देशव्यापी वृत्तसस्थाच्या माऱ्यापुढे त्याचाही बळी गेला. हे सारं पाहून राणी मनातल्या मनात हसत म्हणाली असेल, 'ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य मावळत नाही, हेच खरं !'

सामान्य भारतीय जनतेने मात्र यासर्व सोहळ्यामध्ये फारसा उत्साह दाखवला नाही, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. आकाशवाणी आणि दूरदर्शन या सरकारी माध्यमानीही कौतुकास्पद सयम दाखवला. विशेषत यापूर्वी, १९६१ साली राणी आली होती तेव्हा तिच्या आगमन, स्वागत—सोहळ्याचं धावत वर्णन आमच्या आकाशवाणीने केल होतं. त्या पार्श्वभूमीवर हा संयम जास्तच उठून दिसतो. एरवी घराणेशाहीविरुद्ध टीकेचा डोंब उसळणाऱ्या आमच्या वृत्तपत्रानी मात्र या सम्राज्ञीपुढे सपशेल लोळण घेतली.स्वातंत्र्याची तीन दशक उलटून गेली असली तरी मनाने आम्ही तुमचेच दास आहोत, अशीच ग्वाही जणू त्यानी या निमित्ताने राणीला दिली. केवळ एके काळी आपल्यावर सत्ता गाजवली म्हणून अशा प्रसगी त्या सत्ताधीशाना काळे झेंडे दाखवण्याचा गरज नाही, हे जसं खरं आहे, तसच त्याचे झेंडे खाद्यावर घेऊन नाचणंही अपेक्षित नव्हतं; पण आमच्या मनाला आणि हातांना तसं वळणच गेल्या पस्तीस वर्षांत लागलेल नाही, याला आमचा तरी काय इलाज !

हे सारं नोदवत असताना लोकमान्य टिळकानी १८९७ च्या जूनमध्ये 'केसरी'त लिहिलेल्या अग्रलेखांची आठवण झाली. त्या वेळची इंग्लडची राणी व्हिक्टोरिया हिच्या कारकीर्दीला साठ वर्षं पूर्ण झाल्याबद्दल मोठे महोत्सव त्या वर्षी आयोजित करण्यात आले होते. त्यानिमित्त 'महाराणा सरकारचा जयजयकार' अशा वरकरणी निरुपद्रवी शीर्षकाखाली टिळकानी 'केसरी' मध्ये तीन अग्रलेख लिहिले. एकीकडे राणीच्या कार्याचा गौरव करतानाच या अग्रलेखामधून त्यांनी भारतातील जनतेच्या दु स्थितीचं विदारक चित्रही उभं केलं आणि ब्रिटिशाच्या सर्वंकष सत्तेमुळे आमचे लोक सत्त्वहीन बनले असल्याचं मत खेदपूर्वक नोंदवल. या घटनेला जवळजवळ नव्वद वर्षं झाली; पण परिस्थितीत फार फरक पडला आहे का? टिळकांना बोचलेली सत्त्वहीनता एलिझाबेथ राणीच्या या भारत—भेटीच्या वेळी इथल्या वृत्तपत्रानी पुन्हा एकदा उघड केली. वृत्तपत्र-स्वातत्र्याचा आम्ही तोंडाने कितीही उद्घोष करत असलो तरी आमची मन आमच्यावर दीडशे वर्षं सत्ता गाजवलेल्या त्या ब्रिटनच्या राजघराण्याचीच अजूनही गुलाम आहेत, हेच या निमित्ताने अनुभवाला आलं.

अशा परिस्थितीत दोष तरी कोणाला द्यावा ? फार तर एवढंच म्हणता येईल, 'हे राणी, आम्हाला क्षमा कर ! आम्ही तुझ्याकडून मोठ्या गुर्मीन स्वातत्र्य हिसकावून घेतलं; पण ते उपभोगण्यासाठीदेखील मोठं बळ लागतं, हे त्या वेळी आमच्या ध्यानातच आलं नाही. तुझे गोडवे गाण्यातच आमचं हित सामावलेलं आहे आणि या नश्वर जीवनाचं सार्थकही !'

—सतीश कामत

# इथून-तिथून

### वंचित खेड्यांसाठी पाणी

कर्नाटकच्या हेगडे सरकारने पुढील वर्षीच्या मार्च महिन्यापर्यंत राज्यातील सहा हजार खेडेगावांना पिण्याचे पाणी नियमित पुरवण्याची योजना आखली आहे. यासंबधीची घोषणा ग्रामीण विकासखात्याचे मंत्री अब्दुल नझीर साब यांनी नुकतीच विधानपरिषदेत केली.

'प्रतिनिधिगृहाच्या व्यासपीठावर मी हे आश्वासन देऊन, ते पूर्ण करण्याची जबाबदारीही मी घेत आहे' असे सांगून ते पुढे म्हणाले की, 'हे जर झाले नाही तर आम्हाला या सभागृहातून बाहेर जावे लागेल' खेडेगावातल्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी कर्नाटक सरकारने ६४ कोटी रुपयाचा प्रकल्प आखला असून तो केंद्र सरकारकडे पाठवलेला आहे

मत्र्यानी पुढे सागितले की, पाण्याच्या प्रश्नासंबंधीच्या एका सर्वेक्षणात असे आढळले की, सुमारे वीस हजार गावे आणि चौदा हजार छोट्या वस्त्या यांना दीड किलोमीटरच्या अंतरापर्यंत पाणी मिळण्याची काहीही सोय नाही. यातल्या किमान सहा हजार गावाना पाणी मिळण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आणखी सहा हजार गावांना पुढील वर्षापर्यंत पाणी देण्याची योजना आहे. ◻

### इलेक्ट्रॉनिक टेलिप्रिंटर्स

दळणवळणमंत्रालयाच्या अखत्यारीतील सार्वजनिक क्षेत्रात मोडणारी हिंदुस्थान टेलीप्रिंटर्स लि (एच. टी. एल.) ही संस्था आता लौकरच इलेक्ट्रॉनिक टेलीप्रिंटरच्या उत्पादनाचा प्रकल्प हाती घेणार असून याचा फायदा प्रामुख्याने भाषिक वृत्तपत्राना मिळणार आहे यासबंधीच्या प्राथमिक तयारीला सुरुवात झाली आहे.

एच. टी. एल. तर्फे फेब्रुवारीत हिंदी इलेक्ट्रिक टाइपरायटरचे उत्पादन सुरू झाले. देवनागरी आणि तामिळ भाषेतील इलेक्ट्रिक टाइपरायटरच्या निर्मितीची योजना आता एचटीएलच्या विचाराधीन आहे. इलेक्ट्रॉनिक टेलीप्रिंटर्सच्या जादा संचासाठी जागतिक बँकेकडूनही एचटीएलला कर्ज मिळाले आहे. ◻

## राष्ट्रकुलाची जडणघडण

पृष्ठ ३ वरून

देऊन राष्ट्रे त्याला मान्यता देतील तेव्हाच यश लाभेल.

(१०) तातडीच्या मानवी कल्याणासाठी कृती आवश्यक आहे. स्वहितासाठी या मानवी समस्याबाबत सर्व सरकारानी विधायक व सरळ दृष्टिकोण ठेवला पाहिजे.

(११) वाटाघाटीच्या वेळी राष्ट्रानी पूर्वी ज्यामुळे प्रगती अडली त्या सवयी व प्रतिबंध सोडले पाहिजेत आणि एकमेकांशी बोलण्याचे विधायक मार्ग शोधले पाहिजेत की, ज्यामुळे परिणामकारक सयुक्त कृतीसाठी एकमत होईल.

(१२) तात्रिक व आर्थिक बाबीबरोबरच राष्ट्रानी आपल्या-समोर नैतिक आणि राजकीय विशाल दृष्टीकोण ठेवला पाहिजे.

(१३) समस्या मोठया आहेत हे खरे, परंतु राजकीय इच्छा आणि विविध देश व गटांच्या गरजाकडे समजस वृत्तीने पाहिल्यास आपल्या उद्दिष्टाचा पराजय होईल इतक्या त्या कठीण नाहीत.

(१४) शेकडो लाखो लोक मरतील की जगतील ? सहकार्य की, संघर्ष ? आर्थिक विकास की स्थिरता ? या समस्या आहेत. राज-कीय इच्छा व त्यातून मार्ग काढण्याची तयारी दाखविली नाही तर चालू पिढीचे आम्ही गुन्हेगार ठरू.

(१५) प्रश्न इतके महत्वाचे आहेत की, त्यासाठी व्यक्तिगत जबाबदारी स्वीकारली पाहिजे व लोकाच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या-राजकीय नेत्यांनी त्यात रस घेतला पाहिजे त्याच्याकडे मानवाच्या कल्याणासाठी सर्वात मोठी शक्ती आहे.

(१६) या घोषणेची तत्वे व उद्देश याला सर्वात जास्त महत्त्व देत असतानाच देशाचे अतर्गत स्वातत्र्य व एकमेकातील हितसबध मान्य करण्यात येत आहेत, सध्याचा पेच सोडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे व विकसित आणि विकसनशील देशातील सुसंवाद चालू ठेवण्याचे ठरविण्यात येत आहे. मानवाचे सर्वसाधारण प्रश्न सोडविण्याची तातडीची गरज मान्य करण्यात येत आहे. त्या अंतिम उद्दिष्टाप्रत जाण्यासाठी तातडीची, परिणामकारक व व्यवहार्य कृती करण्याचे सर्व देशाच्या नेत्याना आवाहन करण्यात येत आहे.

### राष्ट्रकुलदिन

१९७६ पासून दर वर्षी मार्च महिन्यातील दुसरा सोमवार हा राष्ट्रकुलदिन म्हणून पाळण्यात येतो. राष्ट्रकुलाचे सदस्य असलेल्या देशातील युवकांना–बहुतेक देशात अर्धी लोकसख्या युवकांची आहे–या संघटनेचे महत्त्व कळावे म्हणून हा दिन पाळण्यात येतो. या वर्षी १४ मार्च १९८३ रोजी राष्ट्रकुलाच्या प्रमुख राणी एलिझाबेथ यानी यानिमित्त दिलेल्या संदेशात म्हटले होते, 'मानवी समाजाच्या सर्व समस्या सोडविणे राष्ट्रकुलाला शक्य नाही; पण जगभर पसरलेला समाज म्हणून जागतिक शांततेसाठी आणि दारिद्र्य नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे मात्र शक्य आहे. प्रत्येक स्त्री–पुरुष व मुलाच्या व्यक्तिगत जीवनाची काळजी राष्ट्रकुलाला आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात अनुभव, कल्पना, कौशल्य यांची देवाणघेवाण करण्यास राष्ट्रकुलातील लोक व देश तयार असतात. जग समृद्ध व्हावे अशी त्याची इच्छा असते.'

राष्ट्रकुल तात्रिक सहकार्य निधी विकसनशील सदस्य देशात तात्रिक शिक्षण व तज्ज्ञ सल्ला देण्यासाठी आहे पुढील वर्षी (८३-८४) या कार्यावर आणखी वीस लाख पौंड खर्च करण्यात येणार आहेत. यावरून राष्ट्रकुल सघटनेची आवश्यकता ध्यानात येते.

### सदस्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

राष्ट्रकुलाची मुख्य कचेरी लंडनला मार्लबरो हाउसमध्ये. राणीने आपल्या मालकीचा हा राजवाडा राष्ट्रकुल कचेरीसाठी १९५९ मध्ये दिला व १९६१ मध्ये तिथे कचेरी सुरू झाली. एकूण सुमारे चारशे कर्मचारी या कचेरीत काम करतात. याखेरीज झांबिया, श्रीलका व ग्रेनाडा येथे विभागीय कचेऱ्या आहेत. राष्ट्रकुल कचेरीत अर्थ, शिक्षण, निर्यात व्यापार विकास, अन्नधान्य उत्पादन व ग्रामीण विकास, आतरराष्ट्रीय कायदा, आरोग्य, विज्ञान, युवक, महिला असे विविध विभाग आहेत सदस्य देशाना या सर्व विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन होते व सल्ला मिळतो. विकसनशील देशाच्या दृष्टीने ही कचेरी म्हणजे एक मोठा आधार आहे.

### ३० टक्के वर्गणी ब्रिटनची

या कचेरीचे वार्षिक अदाजपत्रक सुमारे ४२ लाख ४७ हजार पौडाचे आहे. या कचेरीच्या खर्चाचा मोठा हिस्सा ब्रिटनने उचलला आहे. ३० टक्के वर्गणी ब्रिटनकडून येते त्याखालोखाल नंबर आहे कॅनडाचा. १६.५२ टक्के पैसा कॅनडा देते. त्यानंतर ऑस्ट्रेलिया ९.२१ टक्के. भारताचा हिस्सा फक्त ३.०२ टक्के आहे. उरलेली राष्ट्रे १.५ व ०.७५ टक्के भाग उचलतात. कारण ही सर्व छोटी व आर्थिकदृष्टया गरीब राष्ट्रे आहेत.

जागतिक शातता राखण्यासाठी व मानवी समाजाच्या विकासा-साठी सयुक्त राष्ट्रे ही जगातील सर्व देशाची एक सघटना असताना तसेच तटस्थ राष्ट्राच ही एक सघटना असताना राष्ट्रकुलाची काय आवश्यकता ? राष्ट्रकुल ही सयुक्त राष्ट्राना पूरक सघटना आहे. संयुक्त राष्ट्राशी त्याची स्पर्धा नाही. सयुक्त राष्ट्राची उद्दिष्टे गाठण्यासाठी राष्ट्रकुलाची जागतिक सघटनेला मदत होते. अशा या राष्ट्रकुल सदस्य देशाच्या प्रमुखाची भारतात बैठक सुरू होत आहे. प्रथमच भारतात राष्ट्रकुलप्रमुखाची बैठक भरत आहे त्यात मानव-समाजाची सेवा व जागतिक शाततेच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पडेल अशी अपेक्षा आहे. ☐

### राष्ट्रकुलाची सदस्य राष्ट्रे

१. अँटिगुआ आणि बरबुडा २. ऑस्ट्रेलिया ३. बहामास, ४. बागलादेश ५. बार्बाडोस ६. बेलिझे ७. बोट्सवाना ८. कॅनडा ९. सायप्रस १०. डोमिनिका ११. फिजी १२. गाबिया १३. घाना १४. ग्रेट ब्रिटन १५. ग्रेनाडा १६. गियाना १७. भारत १८. जमैका १९. केन्या २०. किरिबती २१. लेसोथो २२. मलावी २३. मलेशिया २४. माल्टा २५. मालदिवज् २६. मॉरिशस २७. नौरू २८. न्यूझिलँड २९ नायजेरिया ३०. पपुआ न्यू गिनी ३१. सेंट क्रिस्टोफर आणि नेविस, ३२. सेंट लुशिया, ३३. सेंट व्हिन्सेंट आणि द ग्रेनाडाइन्स ३४. सेंचेलिस ३५. सिरा लिओने ३६. सिंगापूर ३७. सॉलोमन बेटे ३८. श्रीलका ३९. स्वाझिलँड ४०. टाझानिया ४१. टोंगा ४२. त्रिनिदाद व टोबॅगो ४३. तुवालू ४४. युगांडा ४५. वातु आतू ४६. वेस्टर्न समोआ ४७. झांबिया ४८. झिंबाब्वे.

हत्ती आणि आंधळ्यांची गोष्ट माहीत आहे ?
कुणाला तो सोंडेसारखा वाटला.
कुणाला पायासारखा
कुणाला पाठीसारखा...

अख्खा हत्ती कुणालाच कळला नाही.

पर्यावरणाचा विचार करताना आपलीही गत अशीच
आंधळ्यासारखी होते.

पर्यावरण निरोगी राखण्यासाठी नेमकं काय काय करायला पाहिजे
हे कुणाच्याच लक्षात येत नाही.

कुणी ' जंगल बचाव ' म्हणतो,
कुणी ' चिपको '.
कुणी ' कारखाने हलवा ' म्हणतो.
कुणी फक्त ' ध्वनी-प्रदूषण थांबवा ' म्हणतो...

हा संपूर्ण हत्ती खरंच कसा आहे ?

**माणूस** यापुढील दोन अंक : **पर्यावरण विशेषांक**

**१० व १७ डिसेंबर ८३**

पर्यावरण आणि अनुषंगिक विषयांची जवळून ओळख करून देणारे
त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे माहितीपूर्ण आणि ललित लेखांचे
दोन संग्राह्य अंक – पर्यावरण विशेषांक.

लिहिताहेत –

| | |
|---|---|
| माधव गाडगीळ | डॉ. सुरेश गजेंद्रगडकर |
| डॉ. जय सामंत | डॉ. दुर्गाप्रसाद मरबली |
| विवेक सावंत | कुसुम कर्णिक |
| शशिकांत चवाथे | जगदीश गोडबोले |
| शरद गोगटे | डॉ. अशोक पटवर्धन |
| पराग जयवंत आणि | डॉ. अनिल गोरे |